



सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २२ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## चीनमध्ये आढळला वटवाघुळांमधील नवा करोना व्हायरस

### कोविड-१९ प्रमाणे जगभर थैमान घालणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२वुहान**

चीनच्या संशोधकांनी वटवाघुळांमधील नवीन कोरोना व्हायरस शोधून काढला आहे, ज्यामुळे जगभरातील देशांची चिंता वाढली आहे. पाच वर्षांपूर्वी चीनच्या वुहान येथून करोना व्हायरस संपूर्ण जगात पसरला होता, ज्यामध्ये लाखो लोकांनी आपला जीव गमावला होता. त्यानंतर आता मानसांमध्ये पसरू शकतो असा नवीन करोना व्हायरसचा प्रकार आढळला आहे.

व्हायरोलॉजिस्ट शी झेंगली यांच्या नेतृत्वाखालील चिनी संशोधकांच्या टीमने वटवाघुळांमधील हा नवीन करोना व्हायरस शोधला



आहे. या नवीन व्हायरसचे नाव 'क्षघण५-उेत-२' असे असून हा व्हायरस मर्बेकोव्हायरस सबजीनसशी संबंधित आहे. तसेच हा नव्याने आढळलेला स्ट्रेन कोविड-१९ प्रमाणेच, तशाच पद्धतीने मानवी पेशींमधील -उए२ रिसेप्टरबरोबर जोडला जाऊ शकतो, असेही रॉयटर्स या वृत्तसंस्थेने एका अभ्यासाच्या हवाल्याने दिलेल्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे.

सेल या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासानुसार, क्षघण५-उेत-२ हा व्हायरस प्रयोगशाळेत मानवी पेशींना संक्रमीत करत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे हा भविष्यात इतर प्राण्यांमध्ये पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, हा व्हायरस वेगवेगळ्या सस्तन प्राण्यांमधील -उए२ रिसेप्टर्सबरोबर देखील एकत्र येऊ शकतो, म्हणजेच अनेक 'इंटरमिडीएट होस्ट'च्या माध्यमातून याचे मानवांमध्ये संक्रमण होऊ शकते.

**पुन्हा महामारी येणार?**

मात्र संशोधकांनी यावर भर दिला आहे की, मानवी पेशींना संक्रमित करण्याची या व्हायरसची सध्याची क्षमता ही कोविड-१९ विषाणूपेक्षा खूपच कमी आहे. मानवी पेशींना जरी हा व्हायरस संक्रमित करू शकत असला तरी मानवी लोकसंख्येला याचा लगेचच धोका असल्याचे वाढवून दाखवण्याबाबत त्यांनी इशारा दिला आहे. अजून याचे निरीक्षण करणे आवश्यक असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे. पण यामुळे जागतिक माहामारी येणार का? याबद्दलची साशंकता अद्याप तरी कायम आहे.

## केंद्रीय मंत्र्यांचा तुटक्या सीटवरून प्रवास एअर इंडिया वर माफीची नामुष्की

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नवी दिल्ली**

विमानातून प्रवास करताना सर्वसामान्य प्रवाशांना अनेकदा विविध अडचणींचा सामना करावा लागतो. कधी विमानतळावर गडबड होते, कधी विमानाला उशीर होतो तर कधी प्रवासादरम्यान, काही तरी अडचण येते. आता असाच गैरसोयीचा अनुभव थेट केंद्रीय मंत्र्यांना आला आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यावर विमानाच्या तुटक्या सीटवरून प्रवास करण्याची वेळ आली, त्यामुळे सगळ्यांनाच धक्का बसला आहे.

शिवराज सिंह चौहान यांनी स्वतः त्यांच्या एक्स हँडलवरून याबाबत माहिती दिली. ते म्हणाले, मला ऑर्गेनिक फार्मिंगच्या बैठकीला जायचे होते आणि चंदीगडमधील शेतकरी



संघटनेच्या नेत्यांनाही भेटायचे होते. यासाठी मी विमानाने जाण्याचे ठरवले. पण प्रवासादरम्यानता अनुभव खूपच वाईट होता. मी एअर इंडियाच्या -श्र४३६ फ्लाइटचे तिकीट बुक केले. मला ८उ सीट मिळाली होती.मी जाऊन सीटवर बसलो, त्यावेळी सीट तुटलेली आणि आतपर्यंत खाली गेली होती. बसणे खूप त्रासदायक होते. मी एअरलाइन कर्मचाऱ्यांना याची विचारणा केली. सीट तुटलेली होती तर मला का देण्यात आली? त्यावर त्यांनी सांगितले 'सीट खराब असल्याचे मॅनेजमेंटला आधीच कळवले होते, त्यामुळे या सीटचे तिकीट विकले जाऊ नये, असेही सांगितले होते. शिवाय अशी एकच सीट नाही, तर अनेक सीट खराब असल्याचे त्यांनी मला सांगितले.

माझ्या सहप्रवाशांनी मला त्यांच्या चांगल्या सीटवर बसण्याची विनंती केली, पण मी माझ्यासाठी दुसर्या कोणाला का त्रास देऊ? असा विचार करून मी त्याच सीटवरून प्रवास पूर्ण करण्याचे ठरवले. यावेळी चौहान यांनी टाटा कंपनीलाही सुनावलं.

## चॅम्पियन्स ट्रॉफीत उद्या 'सुपर संडे' भारत-पाकिस्तानमध्ये 'महामुकाबला'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२दुबई**

पाकिस्तानमध्ये सुरु असलेल्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा चौथा सामना शनिवारी दुबईमध्ये खेळवला जाणार आहे. यामध्ये भारत आणि पाकिस्तान हे कट्टर प्रतिस्पर्धी आमने-सामने येणार आहेत. या सामन्याकडे आशिया खंडातील तसेच संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिले आहे. यासोबतच पाकिस्तानला पहिल्या सामन्यात न्यूझीलंड विरुद्ध ६० धावांनी पराभव पत्करावा लागला. तर टीम इंडियाने पहिल्या सामन्यात बांगलादेशला ६ विकेट्सने हरवले होते. यामुळे पाकिस्तानसाठी हा सामना 'करो या मरो' असा असेल. जर पाकिस्तानने भारताविरुद्धचा सामना गमावला तर त्याच्यासाठी उपांत्य फेरीचे दरवाजे जवळजवळ बंद होतील.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात एकदिवसीय क्रिकेटमध्ये आतापर्यंत एकूण १३५ सामने खेळले गेले आहेत. यापैकी टीम इंडियाने ५७ सामने आणि पाकिस्तानने



७३ सामने जिंकण्यात यश मिळवले आहे. तर पाच सामन्यांमध्ये निकाल लागला नाही. तर एकदिवसीय क्रिकेटमध्ये दोघांमध्ये एकही सामना बरोबरीत सुटलेला नाही.

**४९७ दिवसानंतर भारत-पाकिस्तान आमने-सामने**

भारत आणि पाकिस्तान संघाने एकमेकांविरुद्ध शेवटचा एकदिवसीय सामना २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकामध्ये खेळला होता. आता हे दोन्ही संघ तब्बल ४९७ दिवसानंतर म्हणजेच १ वर्ष ४ महिन्यानंतर आमने-सामने असणार आहेत. तर शेवटी झालेल्या सामन्यामध्ये भारतीय संघाने पाकिस्तान संघावर ७ गडी राखून विजय मिळवला होता.

## ठाकरे गटात समन्वय आणि संवाद नावाची कुठलीही गोष्ट नाही - किशोर तिवारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२यवतमाळ**

ठाकरे गटाकडे कुठलाही कार्यक्रम नाही, दिशा नाही. पक्ष कुठला तरी कार्यक्रम आणि दिशा घेऊन चालला असता तर एवढ्या लोकांनी पक्ष सोडला नसता. सनातनच्या मुद्द्यावर काँग्रेसकडून शिव्या दिल्या जातात, सावरकरांच्या मुद्द्यावर काँग्रेसकडून टीका होत असताना ठाकरे गटाने कधीच स्पष्ट भूमिका घेतली नाही. ठाकरे गटात समन्वय आणि संवाद नावाची कुठलीही गोष्ट नाही. एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीनंतर खासदार पक्ष सोडत होते. तेव्हा त्यांच्याशी कोणीही बोलायला तयार नव्हते. अनेकांनी तेव्हा सांगितले की, विनायक राऊत यांच्या दादागिरीला कंटाळून आम्ही पक्ष सोडून चाललो. ठाकरे गटाकडून निवडणुकीत उभे



राहिलेल्या उमेदवारांना संघटनेची आणि आर्थिक शक्ती दिली जात नाही अशा स्थितीत ठाकरे गट भाजपासमोर टिकूच शकत नाही, अशी खरमरीत टीका किशोर तिवारी यांनी केली.

ठाकरे गटाकडून प्रवक्ते किशोर तिवारी यांची पक्षातून हकालपट्टी करण्याचे आदेश देण्यात आले. यानंतर किशोर तिवारी यांनी पक्षातील अंतर्गत घडामोडींवर बोट ठेवत अनेक गौप्यस्फोट केले. बांगलादेशींमुळे वरुण सरदेसाई, आदित्य ठाकरे निवडून आले; काँग्रेसच्या हिंदूविरोधी वक्तव्यावर बोलू नका, असा आदेश दिला. निवडणुकीच्या काळात प्रवक्ता असतानाही प्रसारमाध्यमांवर हिंदुत्वाचा मुद्दा लावून धरण्यापासून रोखण्यात आले होते. कारण मुंबईत वरुण सरदेसाई आणि आदित्य ठाकरेंच्या विजयासाठी मुस्लिमांचा मतदान आवश्यक होते. त्यामुळे हिंदुत्वाची भूमिका मांडण्यापासून पक्षाकडून थांबवण्यात आले, असा गंभीर आरोप किशोर तिवारी यांनी केला.

**स्वखर्चाने दहा वेळा उद्धव ठाकरेंना भेटायला गेलो, पण काही उपयोग झाला नाही**

शरद पवार यांनी एकनाथ शिंदे यांचा सत्कार केला, त्याबद्दलही शिवसेनेकडून नाहक नाराची व्यक्त करण्यात आली. उद्धव ठाकरे यांना भेटण्यासाठी पैसे खर्च करून किमान दहा वेळेला मुंबईला गेलो. मात्र कधीच उद्धव ठाकरे यांच्याशी भेट झाली नाही. उलट हाकलून लावण्यात आले. उद्धव ठाकरे यांनी कधीच संवाद साधला नाही. फक्त एकदा भेटले आणि मला तुमच्याशी शांतपणे भेटायचे आहे, असे सांगितले. मात्र शांतपणे भेटण्याची ती वेळ आजवर आली नाही, असे किशोर तिवारी यांनी सांगितले. राजन साळवी पक्ष सोडून गेल्यानंतर पक्षात कोणालाही जाग आलेली नाही. ज्याला जायचे आहे ते जा, कोणाच्या जाण्याने काही फरक पडत नाही, पक्षाची अशी भूमिका आत्मघाती आहे, अशी टीकाही किशोर तिवारी यांनी केली.

दरम्यान, संजय राऊत पक्षाचे विचार आणि भूमिका मांडत नाही, ते फक्त स्वतःचे विचार मांडतात. त्यांच्यामुळे ठाकरे गटाची विश्वासार्हता खालवली आहे. संजय राऊत यांनी स्वबळाची भूमिका मांडली आणि दुसऱ्या दिवशीपासून पक्षाला गळती लागली. नागपुरातून आदित्य ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू दुष्यंत चतुर्वेदी यांनी संजय राऊतांच्या स्वबळाच्या घोषणेमुळेच पक्ष सोडला. शरद पवार यांनी एकनाथ शिंदे यांचा सत्कार केला, त्याबद्दलही ठाकरे गटाकडून नाहक नाराजी व्यक्त करण्यात आली, असे रोखठोक मत किशोर तिवारी यांनी व्यक्त केले.

## राज्यात ऑपरेशन टायगर, काँग्रेसच्या बड्या नेत्याची पंचतारांकित हॉटेलमध्ये शिवसेना नेत्यासोबत भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२पुणे**

ज्यात शिवसेनेकडून ऑपरेशन टायगर मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेत अनेक नेते अन् पदाधिकारी शिवसेनेत सहभागी होत आहे. कोकणात शिवसेना उबाठाला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने जोरदार धक्का दिला आहे. त्यानंतर आता शिवसेनेने आपला मोर्चा पुण्याकडे वळवला आहे. पुण्यातील काँग्रेसचे बडे नेते शिवसेनेत सहभागी होणार असल्याची चर्चा सुरु झाली आहे. काही दिवसांपूर्वी रवींद्र धंगेकर यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. आता शिवसेनेचे बडे नेते उदय सामंत आणि रवींद्र धंगेकर यांची एका



पंचतारांकित हॉटेलमध्ये भेट झाली.

राज्यात पुन्हा ऑपरेशन टायगर सक्रिय शिवसेनेकडून काँग्रेसच्या नेत्यांच्या भेटीसाठी सुरू झाल्या आहेत. एका पंचतारांकित हॉटेलमध्ये उदय सामंत यांची काँग्रेसचे पुण्याचे नेते रवींद्र धंगेकर यांनी भेट घेतली. त्यांच्या सुपुत्राच्या आज वाढदिवस असल्याने एकत्र वाढदिवस आहे, असे त्यांनी म्हटले.

**धंगेकर यांचे व्हॉट्सअॅप स्टेट्स चर्चेत**

रवींद्र धंगेकर यांचे व्हॉट्सअॅप स्टेट्स चर्चेत आले. त्यातूनही पक्ष सोडण्याचे संकेत मिळत आहे. या स्टेट्समध्ये रवींद्र धंगेकर गळ्यात भगवा गमछा परिधान केलेला फोटो आहे. तसेच 'तेरे क़दमों के तले मिट्टी भी सोना बन गयी, जर हुआ दुश्मन जहाँ शमशीर तेरी तन गयी. तू वाली है तू महेरमन है निगहमान है तू ही' हे गाणे सोबत जोडले आहे. त्यामुळे रवींद्र धंगेकर काँग्रेस सोडून शिवसेनेत दाखल होणार असल्याची चर्चांना पाठबळ मिळाले आहे.

## पोर्शे कार प्रकरण : मुलाला 'प्रौढ' ठरवून खटला चालविण्याचा मार्ग होणार मोकळा

### बाल न्याय मंडळावर दोन नवीन सदस्यांची नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२पुणे**

मद्यपान करून पोर्शे कार भरधाव चालवीत दोन तरुणांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन मुलाला प्रौढ समजून त्याच्यावर खटला चालविण्याबाबतचा मार्ग आता मोकळा झाला आहे. अपघातानंतर मुलाला जामीन मिळाल्यावर दोन सदस्यांवर प्रक्रियात्मक त्रुटी, गैरवर्तन आणि नियमांचे पालन न केल्याबद्दलचा ठपका ठेवत त्यांची सेवा रद्द करण्याची कारवाई केली होती. त्यामुळे बाल न्याय मंडळाच्या सदस्यांची जागा रिक्त होती. या रिक्त पदांवर दोन नवीन सदस्यांची नियुक्ती केल्याने मुलाला प्रौढ म्हणून खटला चालविण्यावर निर्णय होऊ शकतो, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे.

कल्याणीनगर परिसरात १९ मे २०२४ रोजी मध्यरात्री अडीचच्या सुमारास एका भरधाव आलिशान पोर्शे कारने दोन आयटी अभियंता तरुण-तरुणीला उडविल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही कार पुण्यातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाचा १७ वर्षीय ८ महिन्यांचा मुलगा मद्यप्राशन



करून चालवत असल्याचे समोर आले होते. या प्रकरणात प्रथम त्याला पोलिसांनी ताब्यात घेऊन बाल न्याय मंडळात हजर केल्यानंतर त्याला निबंध लिहिण्याच्या अटीवर अवघ्या १५ तासांत जामीन मिळाला होता. पोलिसांनी बाल न्याय मंडळाच्या हा निर्णय आश्चर्यकारक व धक्कादायक असल्याची भूमिका घेत वरच्या कोर्टात दाद मागितली; परंतु पुन्हा याबाबत बाल न्याय मंडळातच आपली दाद मागण्यास सांगितले होते. त्यानुसार पोलिसांनी सर्व पुराव्यांनिशी मुलाला पुन्हा बाल न्याय मंडळात हजर केले.

पोलिसांनी भक्कमपणे बाजू मांडत मुलावर प्रौढ म्हणून खटला चालविण्यासाठी बाल न्याय मंडळाकडे अर्ज दाखल केला. दरम्यान, मुलाला जामीन दिल्या प्रकरणाची राज्य शासनाने गंभीर दखल घेत राज्य महिला आणि बाल विकास विभागाने चौकशी समिती नेमली होती. या समितीने एल. एन. दानवडे आणि कविता थोरात या दोन सदस्यांविरुद्ध 'प्रक्रियात्मक त्रुटी, गैरवर्तन आणि नियमांचे पालन न केल्याबद्दल' कारवाई करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार एका अल्पवयीन आरोपीला जामीन मिळाल्याप्रकरणी महाराष्ट्र सरकारने येथील बाल न्याय मंडळाच्या (जेजेबी) दोन सदस्यांच्या सेवा रद्द केल्या. चार महिन्यांपासून दोन सदस्यांची पदे रिक्त होती. या रिक्त पदांवर दोन नवीन सदस्यांची नियुक्ती करण्यात आल्याने मुलावर प्रौढ म्हणून खटला चालविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## 'उबाठा, मविआच्या सरपंचांना शून्य टक्के निधी देणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२सिंधुदुर्ग**

मंत्री नितेश राणे यांनी पुन्हा निधीवाटपावरून ठाकरेंची शिवसेना आणि महाविकास आघाडीतील सरपंचांना दम भरला आहे. तुम्हाला एक रूपयाचा विकास निधी मिळणार नाही. चला गाडीत बसा, भाजपचे पट्टे गळ्यात घालून घ्या आणि विषय संपवा, असे विधान नितेश राणे यांनी केले आहे. आपण दबाव टाकतो, दबाव घेत नाही. सगळा विषय क्लिअर आहे, असेही नितेश राणे यांनी म्हटले आहे.

नितेश राणे म्हणाले, एप्रिल महिन्यात नवीन आर्थिक वर्षात पहिल्या आठवड्यात सरपंचांची




यादी घेऊन भसणार आहे. भाजप १०० टक्के, उबाठा शून्य टक्के निधी. बोंबलत बसा आपल्याला काहीही फरक पडत नाहीभाजप वाढला पाहिजे, ही आपली भूमिका आहे. आपण दबाव टाकतो, दबाव घेत नाही. सगळा विषय क्लिअर आहे. आता आपण एसईओची यादी तयार करणार आहे. यात भाजपच्या कार्यकर्त्यांनी आपली नावे जिल्हाध्यक्षांकडे द्यावीत.

## संपादकीय ......

# भाषेच्या समृद्धीसाठी प्रयत्नांची गरज

सात दशकांच्या प्रदीर्घ काळानंतर देशाची राजधानी दिल्लीमध्ये मराठी सारस्वतांचा मेळा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या रूपाने पार पडत आहे. १९५४ मध्ये पहिल्यांदा दिल्लीत झालेल्या या संमेलनाचे उद्घाटन स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले होते. आज (२१ फेब्रुवारी) ते २३ फेब्रुवारीपर्यंत चालणार्या या ९८ व्या संमेलनाच्या निमित्ताने..!

दिल्लीत १९५४ मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू हे त्या संमेलनाचे उद्घाटक होते; तर स्वागताध्यक्षाची जबाबदारी काकासाहेब गाडगीळ यांच्यावर होती. या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जबाबदारी पार पाडली होती. हे संमेलन महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या अगोदर झाले होते. त्यानंतर ७० वर्षांनी पुन्हा २१ ते २३ फेब्रुवारी रोजी दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले आहे. याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे, तर स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार असणार आहेत. संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून तारा भवाळकर असणार आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतरचे हे पहिलेच संमेलन होत आहे. त्यामुळे या संमेलनात नेमके काय चिंतन घडणार याची मराठी रसिकांना आणि साहित्यप्रेमींना निश्चितच उत्सुकता आहे. गेल्या काही वर्षांपासून अधूनमधून मराठी संमेलन राज्याच्या सीमा पार करू लागले आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. पण, केवळ संमेलनांनी सीमा पार करून मराठीला आणि मराठी साहित्याला समृद्धी लाभणार नाही. साहित्य व्यवहार आणि भाषा समृद्धीसाठी जमिनी स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. साहित्य संमेलन हा भाषेचा, साहित्य सारस्वतांचा उत्सव आहे. यानिमित्ताने भाषेच्या भविष्याची चिंताही व्यक्त व्हायला हवी आणि भाषेच्या भविष्याच्यादृष्टीने पावले पडण्याची गरज आहे. केवळ औपचारिक स्वरूपात हा उत्सव होणार असेल तर भाषिक समृद्धतेचा प्रवास घडण्याची शक्यता नाही.

आज भाषिक अस्मितेचा विचार अधिक प्रबळ आणि काही वेळा टोकदार होत आहे. भाषिक अस्मिता असणे चुकीचे नाही, पण तिला दुसर्या भाषेच्या तिरस्काराची किनार असता कामा नये. त्याऐवजी आपल्या भाषेतील मर्मस्थळे, गोडवा, मराठी साहित्यातील मौलिक विचार, भाषेची समृद्धता याविषयी अन्य भाषिकांमध्ये गोडी कशी वाढेल, यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. खरेतर भाषा ही संवादासाठीचे माध्यम आहेच, मात्र त्याचवेळी भाषेने समाज एकसंघ राखण्याचे काम करण्याची गरज आहे. त्यामुळे भाषेचा मोठेपणा मिरवत संघर्ष करण्यात शक्ती वाया घालवण्यापेक्षा भाषा समृद्ध होण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करण्याची गरज आहे. जगातील भाषांचा इतिहास आपण जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर कोणतीही भाषा विकसित होते ती, स्वतःच्या सामर्थ्याने. हे सामर्थ्य आपण जोपासण्याचा प्रयत्न केला तरच भाषा समृद्धतेचा प्रवास घडण्याची शक्यता आहे. यासाठी भविष्यकालीन योजनांची आखणी करून पावले टाकण्याची गरज आहे; अन्यथा केवळ भाषेचा अभिमान बाळगत राहिल्यास काळाच्या प्रवाहासोबत ती टिकत नाही हे लक्षात घ्यायला हवे.

भाषेचे श्रेष्ठत्व जगापुढे मांडण्याचे, ठसवण्याचे काम त्या त्या भाषेचे साहित्यिक करत असतात. कारण त्या भाषेतील वायय ही अधिक महत्त्वाची गोष्ट आहे. एखाद्या भाषेचे साहित्य किती दर्जेदार निर्माण होते हे अधिक महत्त्वाचे आहे. राष्ट्राच्या प्रगतीत साहित्याचा वाटा नेहमीच मोलाचा असतो. वाययीन व्यवहारांअभावी लोक बौद्धिकदृष्ट्या कुंठित होत असतात. समाज जेव्हा बौद्धिकदृष्ट्या कुंठित होतो तेव्हा समाज व राष्ट्राची प्रगती देखील कुंठित होत असते. त्यामुळे जगाच्या पाठीवर साहित्याच्या वाटा चालणार्या राष्ट्रातील समाज प्रगत झालेला आपणास अनुभवास येतो आहे. त्यामुळे केवळ भाषेला शासकीय दर्जा मिळाला म्हणून भाषा श्रेष्ठ ठरते असे घडत नाही. त्या भाषेत किती दर्जेदार साहित्याची निर्मिती होते हे अधिक महत्त्वाचे आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी मोठी प्रतीक्षा करावी लागली; मात्र बर्याच कालखंडानंतर अखेर हा दर्जा मिळाला आहे. यामुळे मराठी भाषिकांची जबाबदारी संपली, असे होत नाही. उलट आता ती कैकपटींनी वाढली आहे. ती लक्षात घेऊन मराठी साहित्यात अधिक दर्जेदार आणि जागतिक दर्जाच्या साहित्याशी स्पर्धा करू शकेल, अशा साहित्याची निर्मिती करण्याची जबाबदारी पेलण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांत मराठी प्रकाशन विश्वात वायय प्रकाशित होत नाही असे नाही; मात्र माणसांची मस्तके बदलू शकेल असे साहित्य किती प्रमाणात प्रकाशित होते आहे? जे होते आहे त्याला किती प्रमाणात प्रतिसाद मिळतो आहे? याचाही शोध घेण्याची गरज आहे. त्यामुळे अशा प्रकारचे साहित्य निर्मितीचे आव्हान पेलण्याची जबाबदारी मराठी भाषिकांवर आणि सारस्वतांवर आहे. उत्तम वाययीन व्यवहाराची गरज वारंवार अधोरेखित होते आहेच, ते व्यवहार गेले काही वर्षे वाढत आहे का? याचाही शोध घेण्याची गरज आहे. कोणतेही राष्ट्र प्रगती करते ते केवळ त्या देशातील आर्थिक श्रीमंतीवर नाही. त्या देशातील वाययीन व्यवहार, साहित्यविचार, साहित्य कलाकृती, साहित्यिक, वाचक यांचाही या प्रगतिप्रवासात मोठा वाटा असतो. साहित्यामध्ये समाजाचे प्रतिबिंब पडते, तसेच साहित्य समाज परिवर्तनही घडवते. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नाही, तर ते समाजाच्या विचारशक्तीला आकार देणारे एक अत्यंत महत्त्वाचे माध्यम आहे. साहित्य समाजाच्या मनोवृत्तीला उत्तेजन देते. विद्यार्थ्यांमध्ये शालेय साहित्य वाचनाची आवड निर्माण करणे हे राष्ट्रविकासासाठी महत्त्वाचे आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये साहित्य वाययामुळे समाजजागृतीचे खूप मोठे कार्य केले, हा इतिहास आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या श्रीमंतीपेक्षाही वाययीन श्रीमंती अधिक महत्त्वाची आहे.

# पाईपलाईन योजनेचा मॅसेज आला का? सात दिवसांत 'हे' काम कराच, वाचा सविस्तर

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक–** पीव्हीसी पाईप याचबरोबर एचडीपी अनुदान केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या माध्यमातून राबवली जाणारी ही योजना आहे. यामध्ये शेतकऱ्यांना पीव्हीसी पाईप आणि एचडीपी पाईपसाठी (झतउ झळशि डलहशाश) अनुदान दिले जाते. या योजनेअंतर्गत जे शेतकरी पात्र झाले आहेत, ज्या शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केलेले आहेत, असे शेतकरी या योजनेअंतर्गत पात्र झालेले आहेत. या शेतकऱ्यांना मेसेज येण्यास सुरुवात झाली आहे








गेल्या अनेक दिवसांपासून महाडीबीटीची लॉटरी लागण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र आता हळूहळू काही योजनांच्या लॉटरी लागण्यास सुरुवात झाल्याचे चित्र आहे. त्यानुसार सिंचन विभागातील योजनांची लॉटरी लागण्यास सुरुवात झाल्याचे पाहायला मिळते आहे. महाडिबीत लॉटरी अंतर्गत ज्या शेतकऱ्यांना मेसेज येण्यास सुरुवात झाली आहे. अशा शेतकऱ्यांना पुढील सात दिवसात कागदपत्रे अपलोड करण्यास सांगितले जाईल

पीव्हीसी पाईप आणि एचडीपी पाईपसाठी अनुदान

तर या योजनेच्या माध्यमातून १०० टक्के आहे आणि ५० टक्के अशा पद्धतीचे अनुदान देण्यात येतं. दुसरीकडे राज्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजना आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना अशा दोन योजना राबवल्या जातात. या योजनेच्या अंतर्गत जे काही पीव्हीसी पाईप आणि एचडीपी पाईप ४२८ रुपये मीटर पर्यंत शंभर टक्के अनुदान आहे.अंतर्गत येणाऱ्या एसटी आणि एसटी प्रवर्गातील शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदान देण्यात येते. तर सर्वसाधारण गटातील शेतकऱ्यांना, एचडीपी पाईप असतील तर ५० रुपये प्रतिमीटर तर पीव्हीसी पाईपसाठी ३५ रुपये प्रति मीटर अशी मर्यादा घालून देण्यात आली आहे. म्हणजेच जवळपास १५ हजार रुपयांचा अनुदान या ठिकाणी शेतकऱ्यांना मिळू शकते.





**ही कागदपत्रे आवश्यक**

तर आता ज्या शेतकऱ्यांना मेसेज द्वारे कळवण्यात आले आहे. अशा शेतकऱ्यांसाठी आधार कार्ड, बँकेचे पासबुक, सातबारा उतारा याचबरोबर कोटेशन अपलोड करण्यासाठी अशी कागदपत्रे लागणार आहेत. ही कागदपत्रे अपलोड केल्यानंतर तुम्हाला पूर्व संमती दिली जाईल. पूर्व संमती मिळाल्यानंतर तुम्हाला पाईपची खरेदी करायची आहे. खरेदीचे बिल पुन्हा एकदा संकेतस्थळावर अपलोड करायची आहे.




# उशीशिवाय झोपणे चांगले की वाईट?

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक –** आपण जर प्रयत्न केला, तर उशी न घेतादेखील चांगली झोप लागू शकते. उशी न घेता, घेतलेल्या या झोपेमुळे आपल्याला जास्त फायदा होतो.



**उशीशिवाय झोपण्याचे फायदे**

उशी न घेता झोपल्याने आपली मान आणि पाठीचा कणा योग्य स्थितीत राहतो. विशेषतः, ज्यांना पोटावर झोपण्याची सवय असते त्यांच्यासाठी ही बाब गरजेची आहे. जाड उशी वापरल्याने मान वरच्या दिशेने झुकल्याने त्यावर ताण येऊ शकतो, तर सपाट पृष्ठभागावर झोपल्याने पाठीचा कणा तटस्थ राहतो आणि मणक्यावर वेदना किंवा दबाव येत नाही. मान आणि पाठदुखी कमी होते : खूप उंच उशी वापरल्याने मानेच्या मणक्याचे सरेखन बिघडू शकते, ज्यामुळे कडकपणा आणि अस्वस्थता येते. उशी काढून टाकल्याने मानेवरील दबाव आणि तणाव कमी होण्यास मदत होऊ शकते. सामान्यतः, मानदुखी असलेल्या लोकांना याचा नक्कीच फायदा होतो. झोपेच्या चुकीच्या स्थितीमुळे ज्यांना दीर्घकालीन मानेच्या वेदनांची समस्या उद्भवते त्यांना उशी न वापरण्याचा नक्कीच फायदा होऊ शकतो.

**उशी शिवाय झोपण्याचे तोटे**

मान आणि खांद्यावर ताण : कुशीवर झोपणार्यांना उशीशिवाय झोपल्यास ताण येऊ शकतो. कारण, त्यांच्या डोक्याला मणक्याशी जुळवून घेण्यासाठी आधाराची आवश्यकता असते. आधाराच्या अभावामुळे मान आणि खांद्यातील स्नायूंचा कडकपणा किंवा वेदना होऊ शकतात. म्हणूनच, एखाद्याला तीव्र मानेच्या आणि खांद्याच्या वेदना उद्भवू शकतात. यासाठी मऊ समांतर उशी गरजेची असते. पोटावर झोपणार्यांना उशीशिवाय झोपल्याने फायदा होतो. पाठीवर आणि कुशीवर झोपणार्यांना योग्य पाठीचा कणा राखण्यासाठी काही प्रमाणात आधाराची आवश्यकता असते. तज्ज्ञांच्या सल्ल्याने उशी वापरणे किंवा उशीचा वापर हळूहळू टाळणे योग्य राहील.

**उशीशिवाय झोपण्यासाठी टिप्स :**

सुरुवातीला पूर्णपणे उशीशिवाय झोपण्यापूर्वी केवळ जाड उशी वापरणे टाळा. कमी जाडीची उशी वापरुन पाहा. असे केल्यास तुमची मान आणि मणक्याला नवीन स्थितीत जुळवून घेण्यास मदत होईल. उशी न वापरता पाठीचा कणा योग्यरीत्या स्थितीत राखण्यासाठी मजबूत आधार देणारी गादी वापरा. उशी न वापरल्याने जर तुमच्या मानेला आधार मिळत नसेल, तर थोड्या उंचीकरिता आणि हळूहळू जुळवून घेण्यासाठी तुमच्या मानेखाली एक छोटा गुंडाळलेला टॉवेल ठेवा. उशीशिवाय झोपल्याने सतत अस्वस्थता किंवा वेदना होत असतील, तर कमी जाडीची उशी वापरा किंवा याबद्दल आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

# दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त अकोल्यात झालेल्या सातव्या साहित्य संमेलनासंबंधीच्या काही आठवणी

## साहित्य परिषदेची घटना साकारणारे अकोल्याचे साहित्य संमेलन

महाराष्ट्रातील साहित्यिक चळवळीला दिशा देणा–या महाराष्ट्र साहित्य परिषदेची घटनेला मूर्त रूप अकोला येथे १९१२ मध्ये भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात मिळाले.इ. स. १९०९ चे मराठी साहित्य संमेलन बडोदा येथे झाले. त्यानंतर इ. स. १९१० व १९११ या वर्षी संमेलन होऊ शकली नाहीत. असा खंड पडू नये यासाठी अकोला येथील सामाजिक चळवळीचे धुरीण, साहित्यिक व प्रबोधनकार वि. मो. महाजनि यांनी पुढाकार घेतला आणि पुढे तो सिद्धीसही आला. वि. मो. महाजनि हे स्वत: पुणे येथे १९०७ मध्ये झालेल्या पाचव्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

व–हाड प्रांताची विद्या– परिषद १९१२ मध्ये अकोला येथे भरणार होती. त्यानिमित्त अकोल्यात महाराष्ट्राची साहित्य परिषद भरवावी, असा विचार प्रबोधनकार महाजनि यांनी मांडला. त्याकाळी बहुतेक दरसाल प्लेगची साथ ठरलेलीच असे. तसे घडू शकते अशी चिंता होतीच. मात्र, सुदैवाने संमेलनाचा योग आलाच.अकोला येथे दि. २९, ३० व ३१ ऑक्टोबर १९१२ रोजी अकोला येथे सातवे साहित्य संमेलन भरले. स्वागताध्यक्ष म्हणून वि. मो. महाजनि यांची निवड झाली. महाराष्ट्रातील सर्व शहरांबरोबरच मराठी बांधवांचे वास्तव्य असलेल्या इंदूर, देवास, धार, ग्वाल्हेर, काशी, प्रयाग, बडोदा, अहमदाबाद, कोलकाता, रंगून अशा सर्व ठिकाणी साहित्यिक व साहित्यप्रेमींना जवळजवळ ८०० पत्रे पाठविण्यात आली.संमेलनात मराठी भाषा, साहित्यासंबंधी सात सत्रांचे आयोजन करण्यात आले. प्रसिद्ध कादंबरीकार हरी नारायण आपटे हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. अकोला येथे त्यांनी केलेले अध्यक्षीय भाषण विचारप्रवर्तक होते. मराठीच्या पुस्तकांत इंग्रजी शब्दांचा भरणा अधिक होत असल्याची चिंता त्याकाळी व्यक्त होत होती. त्याबाबत ह. ना. आपटे यांनी काही उपाय सुचवले. ते म्हणाले की, युनिव्हर्सिटीत महत्वाचे विषय मराठीतून शिकवले जावेत. मॅट्रिकपर्यंतचे सर्व शिक्षण मराठीत झाले पाहिजे. मराठी साहित्य सभेसारख्या संस्थांनी मराठी कोषाची अद्ययावत आवृत्ती नियमित प्रसिद्ध करावी. हिंदुस्थानातील सर्व भाषांच्या प्रतिनिधींनी सहकार्य म्हणून विविध शास्त्रांतील पारिभाषिक शब्दांचा कोष तयार केला पाहिजे.''आपली मातृभाषा मराठी भाषेचा अभिमान आपण धरिला पाहिजे. तो ज्यांनी धरला त्यांच्या अभिमानामुळेच मराठी भाषेला अर्थसमर्थता आली आहे. या अर्थसमृद्ध भाषेत कोणतेही शास्त्र शिक्षण देता येईल, वाटेल तो विचार मांडता येईल. वाङ्मयाचे सर्व हेतू सिद्ध करण्याइतके सार्थ्य आपल्या मातृभाषेत आहे', असे उद्गारही ह. ना. आपटे यांनी काढले होते.संमेलनाची नियमबद्ध घटना असावी, असा विचार बडोद्याला डॉ. कीर्तिकर यांच्या अध्यक्षतेतील संमेलनात पुढे आला होता. त्याला १९१२ मधील अकोला येथील संमेलनात निश्चित स्वरूप प्राप्त झाले. साहित्य परिषदेची घटना प्रत्यक्ष स्वरूपात आकाराला आली. हे अकोला साहित्य संमेलनाचे फलित आहे.संमेलन दरवर्षी व्हावे. विविध प्रांतांत संमेलने घ्यावीत. संमेलनाची आर्थिक तजवीज करण्याच्या दृष्टीने कायमचा फंड उभारण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशा काही सूचना संमेलनातून पुढे आल्या होत्या. अकोला येथील साहित्य संमेलन हे चळवळीला पुढची दिशा देणारे ठरले.त्यावेळी मराठी साहित्य परिषदेचे कार्यालय मुंबई येथे होते. परिषदेची रीतसर घटनेसह स्थापना झाल्यानंतरचे पहिले अध्यक्ष अकोल्याचे प्रबोधनकार वि. मो. महाजनि होते. इ. स. १९१५, १९१७ व १९२२ मध्येही अध्यक्षपदी महाजनि यांचीच निवड झाली. महाराष्ट्राचे साहित्य–सांस्कृतिक केंद्र असणा–या पुण्यामुंबईच्या बाहेरील व–हाडातील अकोला येथील एका व्यक्तीकडे दीर्घकाळ अध्यक्षपद राहावे हा त्यांच्या साहित्यसेवेचा, तसेच अकोला नगराचाही गौरव होता.महाजनि यांच्याच कारकिर्दीत 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' या नियतकालिकाचा प्रारंभ झाला. मराठी भाषेच्या उत्कर्षासाठी महाजनि यांनी केलेले संघटनात्मक कार्य अनन्यसाधारण आहे. त्यांच्याबाबत लेखिका डॉ. पुष्पा लिमये यांनी 'एकोणविसाव्या शतकातील प्रबोधनकार : विष्णू मोरेश्वर महाजनि (व्यक्ती आणि वाङ्मय)' हा ग्रंथ मेहनत व अभ्यासपूर्वक लिहिला आहे. अकोला येथून त्याकाळी 'व–हाड समाचार' हे वर्तमानपत्र प्रसिद्ध होत असे. त्यात या संमेलनाबाबत व येथील सामाजिक चळवळींचा वृत्तांत नियमित प्रसिद्ध होत असे.



**हर्षवर्धन पवार,**
जिल्हा माहिती धिकारी,अकोला

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उद्याला अमरावती दौऱ्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती, –** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उद्या रविवार, दि. २३ फेब्रुवारी अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.त्यांच्या दौऱ्यानुसार, रविवार, दि. २३ फेब्रुवारी ऑक्टोबर रोजी सकाळी १०.२५ वाजता अमरावती येथील बेलोरा विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर सकाळी १०.४५ वाजता विमानतळावरून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाकडे प्रयाण करतील. सकाळी ११ ते दुपारी १२.१५ वाजेपर्यंत विद्यापीठाच्या ४१ व्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील. दुपारी १२.१५ ते १.१५ वाजेपर्यंत राखीव.दुपारी १.१५ वाजता विद्यापीठ येथून वझ्झर फाटा, मल्हारा, तालुका अचलपूर येथे प्रस्थान. दुपारी २.४५ वाजता वझ्झर फाटा येथे आगमन. दुपारी २.४५ ते ३ वाजेपर्यंत स्व.अंबादास पंत वैद्य मतिमंद मूकबधिर बालगृह येथे भेट. दुपारी ३ वाजता अमरावती विमानतळाकडे प्रयाण. दुपारी ४.३० वाजता अमरावती विमानतळावर आगमन. दुपारी ४.३५ वाजता विमानतळावरून मुंबईकडे प्रस्थान करतील.



# शिवसेना ठाकरे गटाची बैठक संपन्न

## जनतेच्या समस्या जाणून घेण्याच्या कार्यकर्त्यांना सुचना२ मार्च रोजी मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हा प्रमुख श्री. नरेंद्र पडोळे यांनी सर्किट हाउस परतवाडा येथे अचलपूर तालुका व चांदूरबाजार तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली. बैठकीत पदाधिकारी यांना सुचना करत असताना प्रत्येक गावात व शहरात शाखा प्रमुख, उपशाखा प्रमुख आहेत त्यांना सक्रीय करण्याची गरज असुन त्यांच्या वेळोवेळी बैठका घेवुन गाव खेड्यातील समस्या जाणून घेऊन त्याचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. त्यासाठी तालुका प्रमुख, उप तालुका प्रमुख, शहर प्रमुख, उप शहर प्रमुख, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख यांनी सक्रीय असने गरजेचे आहे. गाव तिथे शाखा, शहरात प्रत्येक नगरात, मोहल्ल्यात शाखा करून घ्याव्यात असे सुचवले, तसेच दि. २/३/२०२५ला दुपारी २वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती येथील हॉल मध्ये अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यातील पदाधिकारी व शाखा प्रमुख, उपशाखा प्रमुख, व आजी, माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी याचा मेळावा शिवसेना उपनेते आमदार नितीन बांप्पु देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. या मेळाव्याचा जबाबदारी दोन्ही तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली. सदर बैठक सुरू होण्यापूर्वी अचलपूर शहरप्रमुख सागर वाटाणे यांनी शहरातील पदाधिकारी यांच्या सह जिल्हा प्रमुख नरेंद्र पडोळे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देवुन संत्कार करण्यात आला. सदर बैठकीला उपजिल्हाप्रमुख आशिष वाटाणे, विधानसभा समन्वयक अभिजित काळमेघ, तालुका प्रमुख अचलपूर अश्विन नागे, तालुका प्रमुख चांदूरबाजार शैलेश पांडे, शहर प्रमुख परतवाडा सागर वाटाणे, शहर प्रमुख अचलपूर गजानन फिसके, उप तालुका प्रमुख अनिल साइंदे, मनोहर कोथळकर, टिल्लू शर्मा,भास्करराव सुरसाउत, विजय गुलक्षे, सुधीर देशमुख, विलास डोंगरे, नितीन पोटे, शहर समन्वयक गोवर्धन मेहरे,साजीत काजी, अतिश मोरे, पवन खडसे, विंक्की राठोड,पवन राऊत रामदास हागे, सै. सलिमोद्दीन, निकेश पिंपळकर, पन्ना गौर, माणिक देशपांडे, दादाराव तायडे, रुषिकेश रडके, निलेश पवार, शंकरराव भेटाळु, अक्षय पावडे, सुहास कोंडे, मुरली नंदवंशी, वासुदेव तोटे, नितीन घटाळे,नरेंद्र काळे, समाधान गाडगे, माधव राऊत, प्रकाश रताळे, नरेंद्र अकोलकर, शाम शेंडे, खुशाल आनंद गायन, गोकुल इंगळे, मनिष खवले, अरुण करडे, बंडू खेसे, सह दोन्ही तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.–



RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २२ फेब्रुवारी २०२५ — शहर/ग्रामिण

## आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक सुविधांसाठी निधी देणार

### -पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती,** जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देण्यात येईल. प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक सुविधांसह जल संधारणाच्या कामांना प्राधान्याने निधी मंजूर केला जाईल. तसेच सीएसआरमधून निधी उपलब्ध करून देऊ, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी आज जलसंपदा विभाग, जिल्हा परिषदेत जाऊन बैठक घेतली. यावेळी त्यांनी सिंचन, पुनर्वसन, जलसंधारण, आरोग्य, आदींबाबत आढावा घेतला. त्यांच्या समवेत आमदार रवि राणा, प्रताप अडसड, केवलराम काळे, राजेश वानखडे, प्रविण तायडे, उमेश ऊर्फ चंदू यावलकर, प्रविण पोटे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार आदी उपस्थित होते. सिंचन हा शासनाचा प्रथम प्राधान्याचा विषय आहे. प्रामुख्याने गेल्या वीस वर्षांपासूनची सिंचनाची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी जुनी कामे शोधून त्याची दुरुस्ती आणि देखभाल करण्यात येणार आहे. टप्प्याने ही कामे घेण्यात येणार आहे. यामुळे अल्प निधीमध्ये याठिकाणी पाणी साचणार असल्याने सिंचनाची सोय होणार आहे. त्यामुळे प्रत्येक कामाची माहिती सादर करण्यात यावी. सिंचनाची व्यवस्था करताना दर्जेदार पुनर्वसनाची कामे करण्यात यावी. पुनर्वसित गावातील सर्व नागरिक स्थलांतरित होत नाही तोपर्यंत शासनाची जबाबदारी पूर्ण होत नाही. त्यामुळे पुनर्वसनाची कामे जलदगतीने पूर्ण करावीत, असे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी दिले. नाला खोली करण करून त्यातील माती पांदण रस्त्यासाठी वापरण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पात गाळ आणि रेती साचली असल्यास आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत गाळ काढण्याची मोहीम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे



याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यात यावे. जिल्ह्यातील सर्व सिंचन प्रकल्पांना भेटी देण्यात येणार आहे. यात पूर्ण झालेल्या कामांची पाहणी करण्यात येणार आहे. तसेच पुनर्वसन आवश्यक असलेल्या गावातील नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यात येणार आहे. शासनाकडून आवश्यक असलेली मदत यासाठी देण्यात येईल. पाणी गळती ही मोठी समस्या असून या बाबीवर लक्ष केंद्रित करावे. येत्या काळात सिंचनाची व्यवस्था सुरळीत करण्यात येणार आहे. यासाठी यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.जिल्हा परिषदेत जलसंधारण, आरोग्य, महिला व बालविकास आदींचा आढावा घेतला. सार्वजनिक आरोग्य विभागात डॉक्टर आणि रुग्णवाहिका उपलब्ध होण्या साठी प्रयत्न करण्यात यावे. डॉक्टरांसाठी कमी मुदतीत मुलाखती घेण्याचे नियोजन करावे. आवश्यकता भासल्यास आयुर्वेदिक डॉक्टरांची भरती करण्यात यावी. प्रामुख्याने ‘आपला दवाखाना’ येथे डॉक्टरांची व्यवस्था करावी. मेळघाटसारख्या दुर्गम भागात विशेषज्ज्ञ डॉक्टरांची व्यवस्था करण्यात यावी. सर्व शाळा, अंगणवाडीमध्ये वीज पुरवठा करण्यात यावा. याठिकाणी पाणी आणि फिल्टरची व्यवस्था करण्यात यावी. येथे डिजीटल अंगणवाडी आणि शाळा तयार करण्यात येईल. यासाठी सीएसआरमधून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. शासना च्या शाळेत पटसंख्या वाढविण्या साठी आवश्यक ती सर्व मदत करण्यात येईल. जिल्हा परिषदेतर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती पालकमंत्री बावनकुळे यांनी यावेळी जाणून घेतली.

## मराठी परिपूर्ण भाषा अन् अमृताहूनी गोड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गौरवोद्गार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२नवी दिल्ली–** मराठी ही संपूर्ण भाषा आहे. मी जेव्हा मराठीबाबत विचार करतो. तेव्हा मला संत ज्ञानेश्वर महाराजांची एक ओवी आठवते. ‘माझ्या मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजा जिंके’, म्हणजे मराठी भाषा ही अमृताहूनी गोड आहे, या शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेची श्रीमंती विशद केली.

पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे विज्ञान भवनात थाटात उद्घाटन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, स्वागताध्यक्ष खा. शरद पवार, मावळते अध्यक्ष रवींद्र शोभणे, महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे, उज्ज्वला मेहेंदळे, संजय नहार आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

पंतप्रधानांनी भाषणाची सुरवात मराठीतून केली. ते म्हणाले की, संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या मराठीचे मी देशाच्या राजधानीत अतिशय मनापासून अभिवादन करतो.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा हे माझे भाग्य : मराठीला



अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय माझ्या कार्यकाळात झाला हे मी माझे भाग्य समजतो, असे मोदी यांनी मोठ्या अभिमानाने सांगितले. भाषा संस्कृतीची वाहक असते. एक उत्तम समाज निर्माण करण्याचे काम भाषा करीत असते, असेही पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.काश्मिरी मुलींकडून नमोकार मंत्र, पसायदान : काश्मिरी मुलगी रुकय्या मकबूल हिने नमोकार मंत्र म्हटला. काश्मिरचीच शमिमा अख्तर हिने जय जय महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा गीत सादर केले. शमिमा हिनेच कार्यक्रमाच्या शेवटी पसायदान म्हटले.

राजकारण व साहित्य एकमेकांना पूरक : पवार

साहित्यिक आणि राजकारणी यांचे एक अतूट नाते आहे. संमेलनाच्यावेळी नेहमी जी चर्चा होत असते ती यावेळी झाली नाही ही आनंदाची बाब असल्याचे मत शरद पवार यांनी व्यक्त केले. टिळक, नेहरू, वाजपेयी, यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या थोर माणसांनी साहित्याला एक प्रतिष्ठा मिळवून दिली. राजकारणातील माणसे साहित्य क्षेत्रात आहेत. राजकारण आणि साहित्य एकमेकांना पूरक आहेत, असेही पवार म्हणाले. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी पंतप्रधान मोदी यांनी जी भूमिका बजावली आहे त्यासाठी मी समस्त मराठी जनतेच्या वतीने त्यांचे आभार मानतो, असेही ते म्हणाले.

## माजी आ.देवेंद्र भुयार यांच्यावर कारवाई करा

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पालकमंत्री बावनकुळे यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती–** माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी वरुड येथील दैनिक तरुण भारतचे तालुका प्रतिनिधी तुषार अकर्ते यांना मोबाईल वरून धमकी दिली तसेच सोशल माध्यमांवर अक्षपार्य पोस्ट केल्याने पत्रकारांच्या भावना दुखावल्या आहेत. त्यांच्यावर आयटी अक्टनुसार कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई अमरावती जिल्हा शाखेच्या वतीने विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे यांच्या नेतृत्व शुक्रवार (ता.२१) रोजी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना देण्यात आले.

वरुड येथील दैनिक तरुण भारतचे तालुका प्रतिनिधि तुषार अकर्ते यांनी वृत्त प्रकाशित केल्याबद्दल त्यांना माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी भ्रमणध्वनीवर धमकी दिली. तर सोमवारी(ता.१७) रोजी फेसबुक वर असल्या भाडखाऊ पत्रकारांना वठणीवर आणल्या शिवाय राहणार नाही,आता मी रिकामा आहे अशी पोस्ट टाकून पत्रकारांच्या भावना दुखावल्या ने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अमरावती जिल्ह्याच्या वतीने तीव्र निषेध तीव्र करण्यात आला. त्यांच्या वक्तव्या विरोधात कारवाई करण्यात यावी ही मागणी घेऊन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, जिल्हाध्यक्ष प्रवीण शेगोकार, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड, जिल्हा सचिव शुभम मेश्राम, मनीष जगताप उज्वल भालेकर मनीष गुडधे, पी एन देशमुख, विनोद इंगळे राजेंद्र ठाकरे, गजानन खोपे, संजय तायडे, अर्चना रक्षे ,विनोद इंगळे,नितिन मुळे ,नकुल नाईक, विक्रांत ढोके, स्वराज वायकर वीरेंद्रसिंह ठाकूर दिनेश खेडकर जयकुमार बुटे प्रशांत सुने धनराज खर्चान अनिरुद्ध उगले, सागर डोंगरे, सुरेश कपूर, ऋषभ सोनी वैभव गव्हाणे गजानन मेश्राम सागर तायडे, सुनील दामले, सचिन पाटील, यांच्यासह महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ अमरावती जिल्हा शाखेच्या पदाधिकारी, सदस्य पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते.



**पत्रकारांची क्षमा मागावी– पालकमंत्री बावनकुळे**

पत्रकारांशिवाय राज्याचा, देशाचा विकास होऊ शकत नाही. पत्रकारांचा सन्मान ठेवावा त्यांनी टीका केली असेल तर तो त्यांचा अधिकार आहे. पत्रकारांबद्दल विधान केलेल्या माजी लोकप्रतिनिधींनी पत्रकारांची क्षमा मागावी.

## नावेड डेपोतील वाळूचा लिलाव २८ फेब्रुवारीला

**विदर्भ प्रजासत्ताक, दि.२२अमरावती–** मौजा नावेड, ता. भातकुली येथील येथील वाळूडेपोची मुदत संपुष्टात आली आहे. डेपोतून वाळू विक्रीनंतर शिल्लक असलेला वाळूसाठा २ हजार ९२ ब्रास जप्त करण्यात आला आहे. या वाळूचा शुक्रवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता लिलाव करण्यात येणार आहे.सदर वाळूसाठ्याचा लिलाव करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे निर्देश आहेत. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, तिवसा–भातकुली यांनी जाहीरनामा काढण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, तिवसा–भातकुली यांच्या दालनात लिलाव करण्यात येणार आहे. या जाहीर लिलावात इच्छुक व्यक्ती, संस्था आणि शासकीय विभागांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ’फिट्स इन फिटू’ ही दुर्मिळ शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णास सुटी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२२अमरावती, –** स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे दिनांक ४ फेब्रुवारी रोजी तीन दिवसीय बालकाची अतिशय दुर्मिळ शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्या बालकास १७ दिवसानंतर सुटी देण्यात आली. त्यासाठी रुग्णालयातील पेडियाट्रिक सर्जन, बालरोग तज्ज्ञ, व टीमचे आमदार सुलभाताई खोडके, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, संजय खोडके यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

रुग्णाचे आई–वडील यांनाही भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नरोटे, डॉ. नवीन चौधरी, डॉ. उषा गजभिये, डॉ.नागलकर, डॉ. नितीन बरडिया, डॉ. नम्रता भस्मे, डॉ. पाचबुद्धे, आर. एम. ओ. डॉ. माधव ढोपरे, डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ. उज्ज्वला मोहोड, डॉ. विक्रांत कुळमेथे, डॉ. शाम गावंडे आदी यावेळी उपस्थित होते.समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शीतल बोंडे यांनी सूत्रसंचालन तर ऋषिकेश धस यांनी आभार मानले.

## रन फॉर लेप्रसी मॅरेथॉन स्पर्धा २५ फेब्रुवारीला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती–** कुष्ठरोग निवारण दिन म्हणून ३० जानेवारी हा दिवस देशभर साजरा करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात आले.

याअंतर्गत कुष्ठरोगाविषयी जनजागृती होण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन कुष्ठरोगाबाबत भिती व गैरसमज दूर करण्यासाठी जनजागृती करण्यात आली. या आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी मंगळवार, दि. २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता जिल्हा क्रीडा स्टेडिअम, मोर्शी रोड येथून ‘रन फॉर लेप्रसी मॅरेथॉन’चे आयोजन करण्यात आले आहे.स्पर्धेचे अंतर पुरुषांसाठी सुमारे ५ कि.मी. तर महिलांसाठी अंतर ३ कि.मी. राहील.

पुरुषांसाठी स्पर्धेचा मार्ग जिल्हा क्रीडा स्टेडिअम, इर्विन चौक, आय.एम.ए. हॉल, गर्ल्स हायस्कुल चौक, बचत भवन, पंचवटी, गणेशदास राठी हायस्कुल समोरुन जिल्हा क्रीडा स्टेडिअम असे राहील तर महिलांसाठी स्पर्धेचा मार्ग जिल्हा क्रीडा स्टेडिअम, इर्विन चौक, आय.एम.ए. हॉल, गर्ल्स हायस्कुल चौक, डावीकडे वळून गणेशदास राठी हायस्कुल समोरुन जिल्हा क्रीडा स्टेडिअमकडे असे राहील.

रन फॉर लेप्रसी मॅरेथॉन स्पर्धा १० वर्षांवरील व्यक्तींकरिता असून रजिस्ट्रेशन नि:शुल्क आहे. ही स्पर्धा फक्त अमरावती जिल्ह्यासाठी आहे. स्पर्धेमध्ये रजिस्ट्रेशन करणाऱ्या पहिल्या १०० पुरुष व पहिल्या ५० महिला यानांच सहभागी होता येईल. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य राहील. सोबत आधारकार्ड आणणे अनिवार्य आहे. स्पर्धकांना टी–शर्ट व स्पर्धेनंतर प्रमाणपत्र देण्यात येईल. स्पर्धेमध्ये प्रथम येणाऱ्यास ४ हजार रुपये, व्दितीय येणाऱ्यास २ हजार ५०० रुपये व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्यांना १ हजार ५०० रुपये बक्षीस देण्यात येईल. स्पर्धेमध्ये परीक्षकांचा निर्णय अंतीम राहील.

स्पर्धकांना निरोगी असल्याचे हमीपत्र भरुन द्यावे लागेल. अधिक माहितीसाठी ९७६५४३८८०२ तसेच ९४०४२०१३७७ येथे संपर्क साधावा. जास्तीत–जास्त नागरिकांनी रन फॉर लेप्रसी मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्याचे आवाहन आरोग्य सेवा (कुष्ठरोग) सहाय्यक संचालक यांनी केले आहे.

विदर्भ प्रजासत्ताक

## सीईओ संजिता महापात्र यांना बालसेही पुरस्कार

### राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडून निवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती–** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने ’बालस्नेही पुरस्कार २०२४ करिता उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी या नामांकन प्रकारात अमरावती विभागातून जिल्हा परिषदेच्या सीईओ संजिता महापात्र यांची निवड झालेली आहे.



सदर पुरस्कार सोहळा यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे ३ मार्च रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे. सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री, गृह (शहरी) योगेश कदम, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थितीत राहणार आहे.

## १६.६३ कोटींचा डीपीआर; झेडपीत १५ वा वित्त आयोगाचे पुर्वनियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती–** जिल्हा परिषदेला १५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त होणाऱ्या संभाव्य १६.६३ कोटींच्या निधीतून २०२५–२६ चा विकास आराखडा तयार करण्याची पंचायत विभागातून लगबग सुरू झाली आहे. आगामी जिल्हा परिषदेच्या आराखड्यात महत्त्वाच्या कामांचा प्राधान्यक्रमानुसार समावेश करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

१५ व्या वित्त आयोगाचा ८० टक्के निधी हा थेट ग्रामपंचायतींना मिळतो. तर, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेला प्रत्येकी १० टक्के निधी दिला जातो. १६

विभागातील कामांचा विकासआराखड्यात समावेश करण्यात आला आहे. त्यात कामे प्राधान्यक्रमाने मागितली आहे.या कामांचा राहणार समावेश



शासनाच्या मार्गदर्शनानुसार गरिबी निर्मूलन, स्वच्छ गाव, आरोग्य, प्लास्टिकमुक्ती यासह १७ विविध मुद्यांकडे लक्ष वेधून आराखड्यात कामाचा समावेश असावा, अशा सूचना केल्या आहेत. २०२५–२६ या वर्षात बंधित आणि अबंधित याचा विचार करून गरजेची कामे सुचविण्याबाबत विभागप्रमुखांना सूचना दिल्या आहेत. आता शिक्षण, आरोग्यासह जिल्हा परिषदेच्या १६ विभागांतून कामे सुचवली जाणार आहेत. त्याची छाननी केली जाईल व त्यानंतर संबंधित आराखड्याला मंजुरीची प्रक्रिया राबवली जाणार असल्याची माहिती आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीवर प्रशासक राजवट असल्याने १५ व्या वित्त आयोगाचा प्रत्येकी १० टक्के निधी मिळालेला नाही.

# शिवगड येथे शिवजन्मोत्सव थाटात संपन्न

## प्रफुल्ल क्षीरसागर यांचे व्याख्यान, डॉ नितीन धांडे यांचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती–** छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात सर्वसामान्य जनता एकजुटीने राहत असे शिवशाहीच्या काळात कुठलाही रयते सोबत भेदभाव होत नसे.सध्याच्या काळात लोकशाही जाती धर्मात विखुरली गेलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या दिवशी स्मरण करत खरी शिवशाही आता राबाविने गरजेचे आहे.सध्याच्या काळात अंधश्रद्धा, बुवाबाजी, फोफावली आहेशिवशाही व आजच्या लोकशाहीचा परामर्श या विषयावर प्रमुख वक्ते प्रफुल्ल क्षीरसागर यांनी आपल्या सडेतोड प्रबोधनात्मक व्याख्यानातून शिवप्रेमींना मार्गदर्शन केले. या निमित्ताने विदर्भ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ नितीन धांडे यांचा २०२५ चा शौर्य पुरस्कार मिळाल्याबद्दल सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला १९ फेब्रुवारी सकाळी ११ वाजता शिवजयंती निमित्त शिवगड (शिव टेकडी) येथे आयोजितया शिवजन्मोत्सव कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता तथा मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र आडे, यांची उपस्थिती होतीतर विशेष अतिथी म्हणून.आमदार सुलभाताई खोडके माजी खासदार अनंतराव गुढे, माजी महापौर विलास इंगोले, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, किशोर बोरकर, रामेश्वर अभ्यंकर, भारतीय जेसीआयचे राष्ट्रीय प्रशिक्षक अँड. महेंद्र चांडक मराठा उद्योजक कक्षाचे उपाध्यक्ष प्रकाश राऊत जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष हर्षा ढोक शिवगड संवर्धन समितीचे



दिनेश बुब, जेसीआई चे अध्यक्ष दीपक लोखंडेयांची उपस्थिती होतीया सर्व उत्सव दरम्यान १६ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी दरम्यान विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, या स्पर्धेचे बक्षीस वितरण कार्यक्रमात करण्यात आले.वक्तृत्व स्पर्धेचा प्रथम पारितोषिक सौरभ गुडधे , द्वितीय अनिकेत महल्ले, तृतीय पूर्वा केवटी, प्रोत्साहन पर राधिका जगताप, मनस्वी तायडे, तर निबंध स्पर्धेच्या प्रथम पारितोषिक स्वरा कांबळे, द्वितीय आराध्य सोनवणे, तृतीय समृद्धी लोणारे, तर प्रोत्सांहन प्रार्थना नवले, सुहानी रिठे, चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक श्रुतिका काळे, द्वितीय सोहम बिजवे, तृतीय आराध्या जगताप, तर प्रोत्साहन पर बक्षीस प्रियंत लखोरे, आज्ञा सोळंके, इत्यादी स्पर्धकांना रोख रक्कम सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्तेसन्मानित करण्यात आले.यासोबतच पीडीएल स्कॉलर्स अॅकॅडमी अम.चे विद्यार्थी नॅशनल लेवल अभयागत कॉम्पिटिशन ला अमरावती व अकोला येथे चॅम्पियन विनर प्राईज घेऊन यश मिळविले अशा यशस्वी विद्यार्थ्यांचा शिवजयंती कार्यक्रमात आयोजन समितीच्या वतीने सन्मान करण्यात आलासार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित या स्पर्धेत शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाची सुरुवात बाल व्याख्याता आराध्या गजानन ठाकरे हिने शिवचरित्राने केली तर अविनश बावस्कर यांनी पोवाडा सादर केला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सार्व.शिवजयंती उत्सव समितीचे समन्वयक संजय ठाकरे, पल्लवी यादगिरे यांनी केले तर आभार प्रदर्शन मयूर विघे यांनी केले कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष मनीष पाटील, जया डवरे,राम बावस्कर,मनोज सोळंके,मंजू ठाकरे, पूजा लोखंडे,वैशाली शिर्के, कविता कचवे, विजया काळे, दर्शन शेरेकर, मैथिली पाटील,गजानन जवंजाळ, अरविंद पागरुत, वैशाली पागरुत, आरती बोंदरकर, अबोली वानखडे, आम्रपाली वानखडे, पल्लवी बावस्कर, यांनी परिश्रम घेतले शिवजन्मोत्सवाला मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, जेसीआई,अमरावती, धनश्री प्रतिष्ठान, सर्व समविचारी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते शिवप्रेमी शेकडोच्या संख्येने उपस्थित होते शिवजयंतीचा समारोप वनभोजनाने करण्यात आला.

विदर्भ प्रजासत्ताक

# त्या बाळाला १७ दिवसांनी मिळाली सुटी

## दुर्मिळ 'फिट्स इन फिटू'मुळे ३ दिवसाच्या बाळावर झाली होती शस्त्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती–** नवजात बाळाच्या पोटातही गर्भसदृष्य गोळा असल्याचा अतिदुर्मिळ प्रकार बुलडाण्यात काही दिवसांपूर्वी समोर आला होता. दरम्यान त्या बाळाच्या पोटातील गर्भसदृष्य गोळा काढण्यासाठी येथील सुपर स्पेशालिटीमध्ये त्याला दाखल केले होते. तीन दिवसांच्या बाळावर ४ फेब्रुवारीला शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यावेळी बाळाच्या पोटातून अर्भकसदृष्य मांसाचे दोन गोळे काढले. त्यानंतर बाळाला डॉक्टरांच्या देखरेखीत ठेवण्यात आले. तब्बल १७ दिवसांच्या उपचारानंतर शुक्रवारी (दि. २१) बाळाला रुग्णालयातून सुटी देण्यात आली.



१ फेब्रुवारीला बुलडाणा जिल्ह्यातील एका महिलेने सव्वादोन किलोग्रॅम वजनाच्या बाळाला जन्म दिला. या बाळाच्या पोटातही गर्भसदृष्य गोळा असल्याचे प्रसूतीपूर्वी केलेल्या सोनोग्राफीत दिसून आले होते. बाळाची शस्त्रक्रिया करून त्याच्या पोटातून ते गोळे बाहेर काढले. वैद्यकीय भाषेत या प्रकाराला 'फिट्स इन फिटू' म्हणतात. अर्भकसदृष्य हाडामांसाचा गोळा एखाद्या बाळाच्या पोटात वाढणे, असा हा प्रकार असतो. जगात आतापर्यंत अशा ३३ घटनांची नोंद आहे. विशेष म्हणजे आतापर्यंतच्या प्रकरणांमध्ये फक्त एकच गोळा दिसून आला होता. या बाळाच्या पोटातून मात्र दोन गोळे बाहेर काढण्यात आले. ही जगातील बहुधा पहिलीच घटना असावी, असे 'सुपर'चे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे म्हणाले. बाळाला ३ फेब्रुवारीपासून मातेपासून वेगळे ठेवत सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलला आणले. सायंकाळपर्यंत शस्त्रक्रियेपूर्वीच् या सर्व चाचण्या केल्या. बाळ शस्त्रक्रियेसाठी फिट असल्याने डॉक्टरांनी ४ फेब्रुवारीला शस्त्रक्रिया केली. त्यानंतर सुपर स्पेशालिटीतील तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने या बाळाकडे विशेष लक्ष दिले. १७ दिवसांच्या उपचारानंतर बाळ सुदृढ झाल्याने त्या बाळाला रुग्णालयातून सुटी देण्यात आली.

### वैद्यकीय चमूचा आ. खोडके यांच्या हस्ते सत्कार

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथील 'फिट्स इन फिटू'ची ही दुर्मिळ शस्त्रक्रिया करणाऱ्या रुग्णालयातील बालरोग तज्ज्ञ व चमूचा आ. सुलभा खोडके, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, संजय खोडके यांच्या हस्ते सत्कार केला. या वेळी त्या बाळाचे आई – वडील उपस्थित असून यांनाही भेटवस्तू देऊन सन्मानित केले. या सत्कार समारंभात वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शीतल बोंडे यांनी केले तर आभार ऋषिकेश धस यांनी मानले.

# राज्य मराठी पत्रकार परिषदच्या बैठकीचे परतवाडा येथे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अचलपूर –** राज्य मराठी पत्रकार परिषद संघटनेच्या महत्त्वपूर्ण मिटिंगचे आयोजन परतवाडा येथील विश्रामगृहात भवानी हॉटेल समोर, चिखलदरा स्टॉप जवळ बुधवार (१९ फेब्रुवारी) रोजी करण्यात आले. या बैठकीत संघटनेच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.या मिटिंगसाठी प्रमुख उपस्थित संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष मधुसूदन कुलथे, विदर्भ अध्यक्ष संजय जोशी, जिल्हा अध्यक्ष ललित कांबळे तसेच अमरावती जिल्ह्याचे कार्याध्यक्ष फिरोज खान, पत्रकार मोईन चव्हाण, उज्वल अगरवाल, संतोष भालेराव, मोहम्मद अझरुद्दीन नाझीम शा, सय्यद अस्लम, राजू भास्करे, प्रमोद नवाळे, रुपेश बाजपाई, मनीष गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते.

पत्रकारांच्या समस्या आणि संघटनात्मक विषयांवर चर्चा

या महत्त्वाच्या मिटिंगमध्ये अचलपूर–परतवाडा शहरातील सर्व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकारांच्या विविध समस्या, संघटनेच्या भविष्यातील कार्ययोजना, पत्रकार संरक्षण, आणि पत्रकारांसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय योजना यावर सखोल चर्चा करण्यात आली.

संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष कुलथे आणि कांबळे यांनी पत्रकारांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत. त्यांचे हक्क आणि सुरक्षा ही संघटनेची सर्वोच्च जबाबदारी आहे. तसेच त्यांनी पत्रकारांसाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी संघटनेतर्फे प्रयत्न केले जातील, असे सांगितले.

### संघटनात्मक एकजुटीवर भर

या वेळी संघटनेचे अमरावती जिल्हा कार्याध्यक्ष फिरोज खान आणि मोईन चव्हाण यांनी मिटिंगच्या आयोजनाची जबाबदारी पार पाडली. संचालन आणि आभार प्रदर्शन रुपेश बाजपाई यांनी केले. पत्रकारांनी आपल्या समस्या मांडाव्यात आणि संघटनेच्या माध्यमातून त्यावर तोडगा काढण्यात यावा, असा ठराव यावेळी करण्यात आला.या मिटिंगमुळे परतवाडा आणि अचलपूर परिसरातील पत्रकारांमध्ये संघटनात्मक एकजूट निर्माण झाली असून, भविष्यात पत्रकारांसाठी अधिक कार्यक्षम पद्धतीने काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# उद्याला विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ ३८,३०५ विद्यार्थ्यांना पदवी, सर्वाधिक १४,९६३ पदवीकांक्षी विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२२अमरावती–** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ रविवारी (दि. २३) सकाळी अकरा वाजता विद्यापीठातील दीक्षांत मंडपात होत आहे. या दीक्षांत समारंभामध्ये ३८ हजार ३०५ पदवीकांक्षींना पदवी व २३८ विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करण्यात येणार आहे. गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना १२२ सुवर्ण पदके, २२ रौप्य पदकांसह २४ रोख पारितोषिक असे एकूण १६८ पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे. यामध्येही मुलींनीच बाजी मारली आहे. हर्षाली हटवार हिने या वर्षी अमरावती विद्यापीठातून प्रथम क्रमांक



पटकावत सहा सुवर्ण पदकांची मानकरी ठरली आहे.

या निमित्त शुक्रवारी (दि. २१) घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत माहिती देताना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, दीक्षांत समारंभात विज्ञान व तंत्रज्ञान शाखेच्या सर्वाधिक १४ हजार ९६३ पदवीकांक्षीना पदवी प्रमाणपत्रे बहाल केली जातील. त्या खालोखाल ८ हजार ९७३ विद्यार्थी मानव विज्ञान शाखेतून पदवीस पात्र ठरले असून वाणिज्य व व्यवस्थापन शाखेच्या ८ हजार १०९, तर आंतर विद्या शाखेच्या ४ हजार १२३ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे दिली जातील. याशिवाय २३८ विद्यार्थ्यांना पदविका आणि ३५० संशोधकांना आचार्य पदवी दिली जाणार आहे. पत्रकार परिषदेला प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक नितीन कोळी, वित्त व लेखाधिकारी पुष्कर देशपांडे, जनसंपर्क अधिकारी विलास नांदूरकर इतर विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते. तसेच ८९ विद्यार्थ्यांना पदके देऊन गौरवणार : यामध्ये ६७ विद्यार्थिनी, तर २२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यात एकूण ८९ विद्यार्थ्यांना पदके देऊन गौरवण्यात येणार आहे. दोन सुवर्ण व एक रोख पारितोषिकासाठी कोणीही पात्र ठरले नाहीत. पहिल्या तीनमध्ये मुलींनीच मारली बाजी या वर्षी गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार येथील हर्षाली हटवार हिला सहा सुवर्ण व एक रोख पारितोषिक, प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी एंड रिसर्च, बडनेरा येथील निकिता देवचे हिला सहा सुवर्ण, तर लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ येथील उत्कर्षा वानरे हिला चार सुवर्ण, एक रौप्य व दोन रोख पारितोषिक घोषित झाले आहेत.

# खासदार डॉ. अनिल बोंडे यांचा साहित्य संमेलनाच्या विविध सत्रांमध्ये सहभाग

## अ.भा.मराठी साहित्य संमेलनातील ग्रंथ प्रदर्शनींना भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२नवी दिल्ली–** नवी दिल्ली येथील छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी तालकटोरा स्टेडियमवर ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला शुक्रवारी (ता.२१) थाटात सुरुवात झाली. या संमेलनाच्या उद्घाटनिय कार्यक्रमाला राज्यसभेचे सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी उपस्थित राहून मराठी सारस्वतांचा, साहित्यिकांचा उत्साह वाढवला.



दरम्यान त्यांनी ग्रंथ प्रदर्शनींना भेट देत विविध ग्रंथांची खरेदी केली. यासह पहिल्या दिवशीच्या साहित्य संमेलनातील विविध सत्रांनाही हजेरी लावली.

नवी दिल्लीच्या तालकटोरा येथील स्टेडियमवर या संमेलनाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शरद पवार यांनी उद्घाटन केले. मावळते अध्यक्ष रवींद्र शोभणे यांनी वर्तमान अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्याकडे साहित्य क्षेत्राचे सूत्र सोपवली. राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी साहित्य संमेलनाच्या पहिल्याच दिवशीच्या उद्घाटनीय कार्यक्रमाला हजेरी लावली. दरम्यान विविध सभा मंडपात त्यांनी भेटी दिल्या. विशेष म्हणजे ग्रंथ प्रदर्शनीमध्ये असलेल्या विविध पुस्तकांच्या स्टॉलची त्यांनी पाहणी केली.दरम्यान त्यांनी पुस्तकांची खरेदीसुद्धा केली.

### 'माय मराठीचा जागर' ही ऐतिहासिक पर्वणी : डॉ. अनिल बोंडे

अभिजात मराठी भाषेचा ऐतिहासिक महोत्सव राजधानी दिल्लीत होणे ही मराठी जणांसाठी, सारस्वतांसाठी अभिमानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया दरम्यान खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी दिली. ते म्हणाले, जाणत्या जणांचा महाराष्ट्र अशी ओळख सांगताना ती राजधानी दिल्लीतही वृद्धिंगत होतं असल्याचे पाहून आनंद होतं आहे. अशा कार्यक्रमातून राष्ट्रनिर्माणासाठी आवश्यक असलेल्या साहित्यिकांची, चांगल्या कसदार साहित्याची निर्मिती होते. महाराष्ट्रातील साहित्यिकांनी या संमेलनाला भेट द्यावी असे आवाहनही त्यांनी केले आहे

# प्रकृती परीक्षणात पी. आर.पोटे पाटील आयुर्वेद कॉलेज भारतातून चौथे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२ अमरावती–** २६ नोव्हेंबर २४ ते २५ डिसेंबर २४ या काळात भारत सरकारच्या आयुष मंत्रालया तर्फे ' देश का प्रकृती परीक्षण अभियान ' संपूर्ण भारतभर राबवल्या गेले.या अभियानांमध्ये पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेद अमरावती तर्फे उत्स्फूर्त सहभाग नोंदवला गेला. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री प्रवीण पोटे पाटील, उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील, प्राचार्य डॉ. श्यामसुंदर भुतडा यांच्या मार्गदर्शन तसेच कॉलेज चे कार्यक्रम संयोजक डॉ. भार्गव टप्पे,शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. रणजित देशमुख व सर्व शिक्षक याच्या सूक्ष्म नियोजनामुळे महाविद्यालयाने या परीक्षणात स्ट्राईक रेट नुसार भारतातून चौथा



क्रमांक पटकाविला आहे.आयुष मंत्रालयाच्या भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाच्या वतीने मुंबई येथे २० फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात महाविद्यालयातर्फे प्राचार्य डॉ श्यामसुंदर भुतडा व डॉ भार्गव टप्पे यांनी सदर पुरस्कार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद फडणवीस, केंद्रीय आयुष मंत्री ना. प्रतापराव जाधव ,उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते स्वीकारला.महाविद्यालयातील १८० विद्यार्थी १६ शिक्षक तसेच ५ वैद्यकीय अधिकारी यांनी प्रत्यक्ष प्रकृती परीक्षण करून व सर्व शिक्षकेतर व पॅरामेडिकल कर्मचारी यांनी नियोजनात सहकार्य करून दि. २५ डिसेंबर पर्यंत ७५००० प्रकृती परीक्षण करून या हा विक्रम नोंदवला.महाविद्यालयातील द्वितीय वर्षाची विद्यार्थी कु ज्योती ढेपे हिने १५०० प्रकृती परीक्षण करून रेकॉर्ड नोंदवला.महाविद्यालय सदर अभियान आजही जागरूकतेने राबवत असून जिल्ह्यातील शिराळा वळगाव या आरोग्य केंद्रामार्फत प्रकृती परीक्षण करत आहेत . या कार्यक्रमाची ग्रीनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड तर्फे नोंद घेऊन तीन रेकॉर्ड केले गेले. यात आमच्या महाविद्यालयाचा सहभाग आहे.

# सावंगा विठोबा येथील श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानात २७ फेब्रुवारी ला 'चंदन उटी, चैत्र मास मांड' शुमारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२ चांदूर रेल्वे** – जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यातील सावंगा विठोबा येथील सर्व महाराष्ट्रात सुप्रसिध्द असलेले श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे २७ रोजी सकाळी ५ वाजता अमावस्या निमित्तचंदनउटी आणि चैत्र मास मांड शुभारंभ होणार आहे२७ फेब्रुवारी रोजी सकाळी ५ वाजता अवधूत बुवा संस्थानचे लहान मंदिरात विधीवत ढाल : बसवून मुख्य मंदिरात चैत्र मांडीचा शुभारंभ महाराजांचेगणानेविश्वस्त मंडळ आणि भाविक भक्तांचे उपस्थित होणार आहे. त्याच दिवशी दुपारी ४ वाजता संस्थानच्या वतीने अमावस्या निमित्त चंदन–उंटीचा कार्यक्रम होणार आहे. चंदनउटी 'नंतर बाहेर गावावरून येणारे भाविकांकरीता महाप्रसादाचा



कार्यक्रम अन्नदान दाते रुख्मिणी कृष्णराव चांगोले यांचे तर्फे आणि संस्थानचे अन्नदान समिती यांच्या वतीने आयोजित केला आहे. श्री अवधूत बुवा संस्थानमध्ये २७ फेब्रुवारी ते ८ मार्चपर्यंत चैत्र मासनिमित्त 'अखंड जागृती भजन' मांडीचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमाला सर्व भाविक–भक्तांनी तन–मन–धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन अवधूत बुवा संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामण रामटेके, गोविद राठोड, अनिल बेलसरे, फुलसिग राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी यांच्यासह समस्त विश्वस्त मंडळ यांनी केली

# मनपात विविध विषयावर आढावा बैठक

## प्रत्येक कामाला युद्धस्तरावर गती द्यावी : चंद्रशेखर बावनकुळे

### आरोग्य, स्वच्छता व शिक्षणासाठी निधी कमी पडू देणार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

मनपा सर्वसाधारण कामकाज, प्रधानमंत्री आवास योजना, पाणी योजना प्रगती पुरवठा, भुयारी गटार, घनकचरा व्यवस्थापन योजना, स्वच्छता सेवा नियोजन, मनपा निधी बाबत, मनपा कार्यान्वित अन्य प्रकल्प व उपक्रम आदी विषय त्वरीत मार्गी लावावेत. याबाबत संबंधीतांशी समन्वय साधून येणा–या अडचणी त्वरीत सोडवूण प्रत्येक कामाला युध्दस्तरावर गती देण्यात यावी, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. अमरावती शहर स्वच्छ व सुंदर करण्याच्या सुचना यावेळी त्यांनी दिल्या. महसूलमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे शुक्र अमरावती महानगरपालिकेला भेट दिली. आढावा बैठकीत ते बोलत होते.



या बैठकीत पालकमंत्र्यांनी माध्यमनिहाय शाळा, विद्यार्थी व शिक्षक संख्या, मागील पाच वर्षातील अमरावती मनपा शाळांतील पटसंख्येच्या तुलनात्मक आढावा घेतला. आरोग्य, स्वच्छता व शिक्षणाला निधीची कमतरता पडू देणार नाही. शिवटेकडी येथे नविन आराखडा बनवून शासनाकडे निधीची मागणी करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. फिशरीज हबमुळे रोजगार निर्मिती होवू शकणार आहे त्यामुळे सदर व्यवसायात काम करणा–या संस्थांना आर्थिक सहाय्य करण्यात येईल. स्वच्छतेसाठी महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा–यांना प्रशिक्षणसाठी इंदोर येथे पाठवावे. कायाकल्प प्रकल्पातंर्गत प्रथम, व्दितीय व तृतीय शहरी आरोग्य केंद्रांचा सत्कार करण्यात आला तसेच उत्कृष्ट आशांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. आयुक्त सचिन कलंत्रे यांनी महानगरपालिकेच्या कामकाजाची संपूर्ण माहिती यावेळी मा.पालकमंत्री महोदयांना दिली. या बैठकीत मा. पालकमंत्र्यांनी अकोलीघनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा सुरु असलेल्या कामाचा सविस्तर आढावा घेतला तसेच कंत्राटदार कशा पध्दतीने काम करणार हे समजून घेतले. तसेच कामाचे स्वरुप पाहता, कामाचा वेग वाढवून त्यांनी सदर कामाला गती देण्याच्या सुचना यावेळी दिल्या. सदर काम पुर्ण क्षमतेसह त्वरीत कार्यान्वित करण्यात यावे. अमरावती शहरासाठी हा महत्वाचा प्रकल्प असून प्रशासनाने सदर प्रकल्प व्यवस्थितरित्या हाताळावा. या प्रकल्पात काम करणा–या प्रत्येक यंत्रणेने समन्वय ठेवून कार्य करावे अश्या स्पष्ट सूचना कंत्राटदार व अधिका–त्यांनादिल्या. बैठकीत अमरावती शहरातील भुयारी गटार योजना बाबत यापुढे मनपाने समन्वय साधून ही योजना पुर्णत्वास नेण्याबाबत आदेशित केले. अमरावती पाणी पुरवठा योजने संदर्भात त्यांनी संपुर्ण आढावा घेतला. या विभागाने शासनस्तरावरुन पाठपुरावा करण्यासाठी नियोजन करणे गरजेचे आहे. यायोजनेसाठी येणा–या काळात भरीव प्रयत्न केल्या जातील असेही यावेळी त्यांनी सांगीतले.या बैठकीत आ.रवि राणा, आ. सुलभाताई खोडके, आ. प्रताप अडसड, माजी पालकमंत्री प्रविण पोटे, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, अतिरिक्त आयुक्तमहेशदेशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मनपा अधिकारी उपस्थित होते.

प्रोटोकॉल'च्या नावे अधिकाऱ्यांनी वेळ दवडू नयेमंत्री अथवा पालकमंत्र्यांचे दौरे असल्यास अधिकारी राजशिष्टाचारच्या (प्रोटोकॉल) नावे दोन ते तीन तास कार्यालयीन वेळ वाया घालवतात. मात्र, यापुढे मी दौऱ्यावर कुठेही असल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी प्रोटोकॉलच्या नावाने वेळ वाया घालवू नये, त्याऐवजी कार्यालयात बसून सामान्य नागरिक, शेतकऱ्यांची प्रशासकीय कामे मार्गी लावावीत, अशा सूचना राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी येथे यंत्रणांना दिल्यात.ना. बावनकुळे हे अमरावतीत दौऱ्यावर आले असता, ते माध्यमांशी बोलत होते. यापुढे माझ्या कोणत्याही दौऱ्यात 'प्रोटोकॉल' मध्ये येणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांनी येऊ नये. मंत्र्यांचे दौरे लागले की, अधिकारी दोन ते तीन तास 'प्रोटोकॉल'च्या नावाने कार्यालयीन वेळ वाया घालवतात. त्यामुळे माझ्या दौऱ्यात येण्याऐवजी अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयातच बसून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजुरांची महत्त्वाचे काम मार्गी लावावे. त्यामुळे अमरावती जिल्ह्यासह विदर्भाचा विकासाला वेग येईल, असे ते म्हणाले.

# हजारो क्विंटल कापसाची साठवणूक

## शेतकरी दरवाढीच्या प्रतीक्षेत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

बाजार यंदा कापसाचे उत्पादन कमी झाले. त्यामुळे दरवाढीच्या आशेने कापूस घरात साठवून ठेवल्याने आता अंगाला खाज सुटली आहे. यंदा अतिवृष्टी, बोंडअळी, नापिकीच्या धसक्याने कापूस उत्पादक शेतकरी हादरला होता. शेकडो हेक्टर पिके नेस्तनाबूत झाली. त्यामुळे कापसाच्या शेतीला उत्पादनात मोठ्याप्रमाणावर घट झाली. अतिवृष्टीच्या तावडीतून वाचलेली कपाशी कशीबशी सावरली. महागडी कीटकनाशके, रासायनिक खते, मजुरांची टंचाई यातून सावरलेल्या पिकांना शेतकऱ्यांना सध्या कवडीमोल भावाने कापूस विकावा लागत आहे. फेब्रुवारी मध्यावर असतानाही भाव ७१५० रुपयांवर स्थिरावला आहे. याभावात शेतकरी परवडत नसल्याने माल घरातच साठवला असल्याने शेतकरी अडचणीत आले आहे.

**सीसीआयने आखडला हात**

हमीभावाने जिल्ह्यातील नऊ केंद्रांवर कापसाची खरेदी करण्यात येत आहे. यामध्ये कधी केंद्र बंद तर बहुतेकवेळी खरेदीची मंदगती असते. सीसीआयच्या या पावित्र्याने कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहे.

# वाहन धारकांनी आपली बेवारस वाहने घेऊन जावी; ठाणेदार दिपक महाडीक यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ वरुड**

गेल्या अनेक वर्षांपासून शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशन हद्दीत बेवारस मिळून आलेले वाहन पोलिस स्टेशन परिसरात ठेवण्यात आले आहे. मात्र आजपावेतो या वाहनांचा ताबा वाहन मालकांनी घेतलेला नसल्याने ज्यांची वाहने हरविली असतील त्यांनी १५ दिवसाचे आत शेंदुरजनाघाट पोलीस स्टेशन येथुन शहानिशा करून आपली वाहेने घेऊन जाण्याची विनंती करण्यात आली आहे. १५ दिवसानंतर या सर्वच वाहनांचा लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशनचे ठाणेदार दिपक महाडीक यांनी दिली.

तालुक्यातील शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक महाडीक यांनीएका प्रसिद्धी पत्रकातून नागरीकांना आवाहन केले की, पोलीस स्टेशन शेंदुरजनाघाट येथे बऱ्याच कालावधीपासुन तब्बल ८० दुचाकी वाहन (मोटार सायकली) या बेवारस अवस्थेत मिळाल्याने पोलीस स्टेशन परीसरात ठेवण्यात आलेल्या आहे. तरी सदर वाहन हे ज्यांचे कोणाचे असतील त्यांनी पोलीस स्टेशन शेंदुरजनाघाट जिल्हा अमरावती ग्रामिण येथे ०७२२९ –२३८२८० या क्रमांकावर संपर्क साधुन आपल्या वाहणाची कागदपत्रे सादर करून तसेच आपल्या वाहणाची शाहानिशा करून आपले वाहन परत घेउन जाण्याची कायदेशिर कार्यवाही करावी. सदर बातमी प्रकाशित झाल्या पासुन १५ दिवसाचे आत सदर वाहणाचा मालकी हक्क दाखविण्यात कोणीही हजर न झाल्यास सदर वाहणाचा कायदेशिर लिलाव प्रक्रिया करण्यात येईल व याबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप किंवा हरकत स्वीकारली जाणार नाही करीता शहरासह संपूर्ण तालुका, जिल्हा, सोबतच लागुनच असलेल्या मध्यप्रदेशातील नागरीकांनी शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशन येथे येऊन वाहनांची शहानिशा करण्याचे आवाहन सुद्धा शेंदुरजनाघाट पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक महाडीक यांनी एका प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# शेती साहित्याची चोरी; सहा जणांच्या आवळल्या मुसक्या : एलसीबीची कारवाई; ८ पोलिस ठाण्यात शेती साहित्य चोरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२परतवाडा**

अमरावती ग्रामीण पोलिस हादीत शेतीउपयोगी साहित्य चोरीचे प्रमाण वाढत असल्याने ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी अशा चोरीच्या घटनांना आळा घालण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेने अचलपूर उपविभागात कारवाई करत शेती साहित्य चोरणाऱ्या सहा जणांना ताब्यात घेत त्यांच्याकडून केलेले शेती साहित्य जप्त केले आहे. चोरी



अचलपूर तालुक्यातील जवर्डी येथील रहिवासी शंकर रमेश बोरवार (३३), विलास गणाजी बोरवार (३०), अंकुश गोपाल पारिसे (३२), तर अचलपूर येथील कासट्पुरा निवासी मजहर खाँ चांद खाँ (२४), अब्दुल गफ्फार शेख मोहम्मद (६१) व चांदूर बाजार तालुक्यातील राजनापूर्णा येथील रहिवासी आकाश विलास पारिसे (२६) अशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या शेती साहित्य चोरट्यांची नावे आहेत.

गुप्त माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दुचाकीने जाणाऱ्या चौघांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांच्याजवळ असलेल्या प्लास्टिक पोत्यात केबल वायर, तांबा तार हे साहित्य मिळून आले. त्यांना विश्वासात घेऊन चौकशी केली असता, शेतातून मोटार पंप, मशिन, स्प्रिंकलर पाइप, ॲल्युमिनियम तार, शेतीउपयोगी साहित्य चोरल्याचे त्यांनी सांगितले. हे चोरलेले साहित्य दुल्हागेट येथील भंगार दुकानदारांना कमी किमतीत विकल्याचे सांगितले. माल खरेदी करणारे भंगार दुकानदार मजहर खाँ व अब्दुल गफ्फारकडून तीन मोटर पंप मशीन, ४७स्प्रिंकलर नोझल, ९ प्लास्टिक पाइप व तार मिळून आली. ताब्यात घेतलेल्या युवकांकडून एकूण २ लाख २० हजार ७०० रुपयांचा माल जप्त केला असून, त्यांना पुढील कारवाईसाठी सरमसपुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे, सपोनि सचिन पवार व पोलिस कर्मचाऱ्यांनी केली आहे.

**ताब्यात घेतलेले चोरटे व तपास पथक**

चोरीचे एकूण १३ गुन्हे उघड पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या या चोरट्यांनी आठ पोलिस स्टेशन हद्दीतील १३ गुन्ह्यांची कबुली दिली आहे. त्यापैकी त्यांनी शिरजगाव पोलिस स्टेशन हद्दीतील तीन, सरमसपुरा, परतवाडा व ब्राह्मणवाडा थडी पोलिस ठाण्यांतर्गत प्रत्योश्री दोन, तर आसेगाव, चिखलदरा, चांदूर बाजार व अचलपूर पोलिस ठाण्यांतर्गत प्रत्येकी एक अशा एकूण १३ गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

# लेखन, व्याकरणाचा सराव असलेल्यांसाठी इयत्ता दहावीचा मराठीचा पेपर होता सोपा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

दहावीचे वर्ष टेंशनचे, नातेवाइकांकडून सतत अभ्यासावर विचारणा, पहिलीच बोर्डाची परीक्षा, अभ्यास केला तरी मनावर त्याचे आगळेच दडपण, प्रत्यक्ष परीक्षा सोडवताना वेळ पुरणार का? केलेला अभ्यास आठवणार का? आदी संभ्रमासह जिल्ह्यातील २६ हजार विद्यार्थ्यांनी बोर्डाचा प्रथम पेपर दिला. मात्र, मराठीचा सोपा पेपर सर्व चिंता दूर करणारा ठरला, अशा प्रतिक्रिया पेपर सुटल्यावर विद्यार्थ्यांनी हर्षोल्लासात दिल्या.

लेखन आणि व्याकरणाचा सराव असणाऱ्यांसाठी पेपर सरल असल्याचेही विद्यार्थ्यांनी सांगितले. पहिल्या दिवशी जिल्ह्यात एकही कॉपीचे प्रकरण पुढे आले नाही. ११९ केंद्रावर परीक्षेचे आयोजन केले होते. सकाळी ११ ते दुपारी २.१० वाजेदरम्यान पेपर झाला.

सकाळी ९.३० वाजतापासून परीक्षा केंद्रावर विद्यार्थी व पालकांनी हजेरी लावली. अनेक शाळांनी १०.१० मिनिटाने विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र आवारात, तर १०.२० मिनीटाने वर्गामध्ये प्रवेश दिला. सर्वच केंद्रावर ११ वाजतापर्यंत पालकवर्गाची गर्दी दिसून आली. हिच गर्दी पेपर सुटण्याच्या वेळीही कायम होती. केंद्रांवर पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# विभागस्तर व जिल्हास्तर नवोपक्रम स्पर्धेचे बक्षीस वितरण : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेद्वारा २३ नवोपक्रमकार सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावतीद्वारा विभाग स्तरीय व जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती येथे घेण्यात आला. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मिलिंद कुबडे यांचे अध्यक्षतेखाली हा बक्षीस वितरण सोहळा घेण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून वरिष्ठ अधिव्याख्याता प्रेमला खरटमोल, अधिव्याख्याता डॉ.राम सोनारे, डॉ. दीपक चांदूरे, डॉ.इम्रान खान, डॉ. विजय शिंदे आदींची उपस्थिती होती.शिक्षकांमध्ये नावीन्यपूर्ण अध्ययन अध्यापनाला चालना मिळावी व विद्यार्थ्यांचे शिकणे अधिक सुलभ व्हावे या करिता दरवर्षी नवोपक्रम स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने नवोपक्रम स्पर्धेचे पाच गटात आयोजन करते.




जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेत पूर्व प्राथमिक गटात दहीगाव अंगणवाडी केंद्राच्या खुर्दच्या चैताली सावरकर ह्यांनी प्रथम तर बऱ्हाणपूर अंगणवाडी केंद्राच्या कोमल ढगे यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त झाल्याबाबत सन्मानित करण्यात आले.प्राथमिक शिक्षक गटातून प्रथम क्रमांक जिल्हा परिषद शाळा सालेपुर येथील डॉ.अनिल मोकोडे, द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद शाळा शिरपुरच्या वर्षा सुर्यवंशी, तृतीय क्रमांक जिल्हा परिषद शाळा मल्हाराचे बबलू कराळे, चतुर्थ क्रमांक जिल्हा परिषद शाळा सालणापुरचे विनोद राठोड पाचवा क्रमांक जिल्हा परिषद शाळा आडगावच्या कांचन खाडे यांनी पटकाविला. जिल्हा परिषद कन्या हायस्कूल अमरावती येथील वीरेंद्र ब्राम्हण व जिल्हा परिषद शाळा बऱ्हाणपूर चे डॉ. निलेश इंगोले यांनी सन्मानित करण्यात आले.माध्यमिक गटात प्रथम क्रमांक तुकडोजी महाराज विद्यालयाचे सुधीर केने, द्वितीय क्रमांक जनता हायस्कूल वरूडचे अतुल पडोळे, तृतीय क्रमांक टोंपे महाविद्यालयाचे प्रणित देशमुख, चतुर्थ क्रमांक मन्नालाल गुप्ता विद्यालय चांदूर रेल्वेच्या स्वप्नाली चौखंडे, पाचवा क्रमांक रामकृष्ण विद्यालय कांडलीचे विनायक ताथोड, तर उत्तेजनार्थ म्हणून पंचशील विद्यालय कारंजाच्या शुभांगी पापळकर, माध्यमिक विद्यालय उत्तमसरा येथील शीतल भोपाळे यांना सन्मानित करण्यात आले.

विभागस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत विषय साधनव्यक्ती गटात प्रथम क्रमांक गटसाधन केंद्र चांदूर बाजार येथील प्रियदर्शिनी झोड, द्वितीय क्रमांक गटसाधन केंद्र वाशिम येथील स्वाती नाचोने, तृतीय क्रमांक गटसाधन केंद्र मानोरा येथील मोतीराम जाधव, चतुर्थ क्रमांक गटसाधन केंद्र मूर्तिजापर येथील प्रविण मोहोड तर पाचवा क्रमांक गटसाधन केंद्र कारंजा लाड येथील वैशाली शेटे यांना सन्मानित करण्यात आले. अधिकारी व पर्यवेक्षकीय गटात प्रथम क्रमांक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ येथील अधिव्याख्याता मधुमती सांगळे, घाटंजी येथील प्रभारी केंद्र प्रमुख अशोक सिंगेवार यांना सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन संशोधन विभाग प्रमुख तथा वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. विजय शिंदे यांनी केले तर आभार डॉ.दीपक चांदूरे यांनी मानले.

# हिंदू शेरणी नवनीत राणा यांना हैद्राबाद कोर्टाची नोटीस

## कोर्टाचा सन्मान करुन नवनीत राणा उपस्थित राहणार




SUMMONS TO AN ACCUSED PERSON
(Sec. 61 Cr. P.C.)
In the Court of the Addl. Jl. Fm Court Magistrate
AT Chaderghat
C.C. No. 808 of 2024
Between ... Complainant
AND
... Accused
To ...
Whereas your attendance is necessary to answer to Charge
u/s 171 C r/w 171-F, 171-G, 188 IPC you are hereby directed
to appear in person or by pleader
before the Hon'ble Addl. Jl. Fm Chaderghat Court
on the day 28/2/25 10-30 a.m.
Dated this 13 day 1 2025
Seal
Magistrate
The Advocates' Co-Op. Society Ltd., Hyd. ☏: 24418387

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

हैदराबाद लोकसभा निवडणुकीदरम्यान ओवैसी यांनी हिंदू कडे इशारा करत अभद्र बयान करत फक्त पंधरा मिनिट मागितले होते त्यांचे या विधानाचा खरपूस समाचार हिंदूशेरणी तत्कालीन खासदार नवनीत राणा यांनी त्यांचे या विधानाला हैदराबाद मध्ये जाऊन उत्तर देतं फक्त पंधरा मिनिट नहीं मुझे १५ सेकंद ही होणा असे आवाहन दिले होते.असा समाचार घेत सर्व देशाचे लक्ष केंद्रित केले होते.

हि लढाई आता न्यायालयाची झाली आहे हिंदूशेरणी नवनीत रवी राणा यांना वरील प्रकरणी हैदराबाद येथील न्यायालयाची दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी न्यायालयात उपस्थित राहण्याची नोटीस प्राप्त झाली आहे.कोर्टाचा सन्मान करुन नवनीत रवी राणा ह्या उपस्थित राहतील.या प्रकरणी सर्व हिंदू लोकांच्या नजरा लागल्या आहेत.

# चार ओव्हर खेळूनही पालकमंत्री नाबाद...

## आऊट करण्यासाठी पाच आमदारांना आवाहन मात्र आमदार अपयशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**



अमरावती चे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ५ आमदारांना आव्हान करीत होते मात्र एकही आमदार आऊट करू शकले नाही, यामुळे पालकमंत्री बावनकुळे क्रिकेट सह राजकारणात किती परिपक्व आहे याचा प्रत्यच अमरावती कराना पहायला मिळाला ,निमित्य होत.. आमदार रवी राणा यांच्या दसरा मैदानात सुरू असलेल्या क्रिकेट टूर्नामेंटच्या उद्घाटन प्रसंगाचा ,पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना आमदार रवी राणा यांनी बॅटिंग करण्याचे आव्हान केले, सुरुवातला आमदार रवी राणा यांनी बॉल टाकत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना आऊट करण्याचा प्रयत्न केला मात्र रवी राणा पालकमंत्री बावनकुळे यांना आऊट करू शकले नाही ,यावेळी प्रताप दादा अडसड,प्रवीण तायडे , केवलराम काळे व डॉ.संजय कुटे यांना आमदार रवी राणा यांच्या मदतीला बॉलिंग टाकण्यास धाऊन आले मात्र पाच आमदारानी तब्बल चार ओहर टाकल्यानंतर सुद्धा पालकमंत्री बावनकुळे आऊट होऊ शकले नाही ...

कोणताच आमदार मला आऊट करू शकला नाही, असा टोला बावनकुळे यांनी लगावतास मैदानातील सर्वांना हसू आलो..यावर रवी राणा यांनी आपण आऊट झाली असते तर माझा नंबर लागला असता असं प्रत्युत्तर दिल्याने.. यावेळी उपस्थित असलेल्या सर्व आमदारांच्या भुया उंचावल्या.

# शेतात चक्क अफूची लागवड... १२ कोटी ६० लाख रुपयांचा अफू पोलिसांनी केला जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२बुलढाणा**



काही भरकटलेले शेतकरी जादा पैशांच्या लालसेपोटी गांजाची शेती करतात. याच्यावर स्थानिक पोलीस किंवा स्थानिक गुन्हे शाखा कारवाई करण्याच्या घटना घडल्या आहे. मात्र देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा येथील एका शेतकऱ्याने आपल्या शेतात चक्क अफूची लागवड केल्याचे आढळून आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत ही बाब उघडकीस आले.

या बहाद्दर शेतकऱ्याच्या घरातून तब्बल साडेबारा कोटींची अफू जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई जिल्ह्यातीलच नव्हे राज्यातील मोठ्या कारवाई पैकी एक असल्याचे मानले जात आहे. अंढेरा शिवारातील संतोष मधुकर सानप (४९) याने त्याच्या शेतात अफूची शेती केली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांना याबाबतची गोपनीय माहिती मिळाली. त्यांनी पोलीस पथकासह शुक्रवारी, एकवीस फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा छापा घातला.

या कारवाईत अंढेरा पोलिसांनी देखील सहकार्य केले. आरोपीच्या ताब्यातून १५ क्विंटल ७२ किलो अफू ताब्यात घेण्यात आली.या मालाची बाजारभावाने किंमत १२ कोटी ६० लाख रुपये एवढी असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेच्या वरिष्ठ सूत्रांनी सांगितले. अंढेरा पोलीस ठाण्यात आरोपी संतोष मधुकर सानप विरुद्ध ' एनडीपीएस' कायद्याच्या कलम आठ क, अठरा क नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय प्रथम तर संभाजीनगरचा संघ ठरला द्वितीय पारितोषिकाचा मानकरी

## काळानुरूप बदलणे आवश्यक - आ.सुलभाताई खोडके : डॉ.पंजाबराव देशमुख स्मृति रौप्य महोत्सवी राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**




कुटुंब व्यवस्था बदलली असल्याने मानव समाज विखुरलेला आहे. संयुक्त कुटुंब व्यवस्था लोप होत असतानाच एकत्रित कुटुंब व्यवस्थेला डावलून विभक्त कुटुंब व्यवस्था समाजात रुजू होत आहे.त्यामुळे सामाजिक जीवन जगताना काळानुसार बदलण्याची गरज आहे असे मत आ .सुलभाताई खोडके यांनी व्यक्त केले.डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथे आयोजित रौप्य महोत्सवी वाद विवाद स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. उद्घाटन सत्राला अध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ड .जे .व्ही.पाटील उपाख्य भैय्यासाहेब पुसदेकर होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख,प्रा. डॉ .रामटेके यांची प्रमुख उपस्थिती होती. आजच्या आधुनिक युगामध्ये वृद्धाश्रम व्यवस्था हि कुटुंब व्यवस्थेला पर्याय असू शकते,या विषयावर झालेल्या वाद-विवाद स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त करून स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सुलभाताई खोडके यांच्यासह ड.जे.व्हि.पाटील पुसदेकर यांनी देखील आपले विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उद्घाटन सत्राचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ वर्षा देशमुख, संचालन प्रा.डॉ.राधिका देशमुख तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.गजश्री बोडखे यांनी केले. स्पर्धेत मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचा संघ प्रथम पुरस्काराचा मानकरी ठरला. यश टेबले व समृद्धी घोडचरे यांच्या संघाला रोख रक्कम अकरा हजार रुपये आणि डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती चषक देऊन गौरविण्यात आले. सदर पुरस्कार हा स्व.सुधाकरराव काळे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रा.डॉ.रवींद्र काळे यांच्या वतीने देण्यात आला. द्वितीय पुरस्काराचा मानकरी संभाजीनगर येथील माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाचा संघ ठरला. त्यांना स्व.प्रभाकरराव पांडे स्मृती प्रित्यर्थ ड.अचला काशीकर यांच्या वतीने रोख रक्कम ७००० आणि चषक देऊन गौरविण्यात आले. या संघामध्ये सौरभ लोंढे व वैभव बंगाळे या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. तर तृतीय पुरस्काराचा मानकरी श्री. शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथील कु.कादंबरी सरदार व प्रीती पांडे यांचा संघ ठरला त्यांना स्व.राजेंद्रसिंह बयस स्मृति प्रित्यर्थ प्रा.डॉ.योगीराज सिंग बयस यांच्याकडून रोख रुपये ५००० आणि स्मृति चषक देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक कृष्णा नलावडे याला स्व .विनायकराव ठाकरे स्मृति प्रित्यर्थ प्रा.डॉ.उद्धव ठाकरे यांच्या वतीने रोख रक्कम ३००० आणि स्मृतीदिन देऊन गौरविण्यात आले. वैयक्तिक द्वितीय पुरस्कार स्व.निर्मलाताई भोगे स्मृतिप्रित्यर्थ प्रा.डॉ.संजय भोगे यांच्याकडून रोख रक्कम २००० आणि स्मृतिचिन्ह देऊन सौरभ गुडदे याला सन्मानित करण्यात आले. तर उत्तेजनार्थ तृतीय पारितोषिक स्व .देविदासजी पांडे स्मृती प्रित्यर्थ प्रसाद पांडे यांच्याकडून रोख रक्कम १००० आणि स्मृतिचिन्ह देऊन गणेश राऊत या विद्यार्थ्याला गौरविण्यात आले.स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ .सुरज हेरे, रश्मी नावंदर, व भगत सर यांनी केले. संपूर्ण स्पर्धेचे अध्यक्ष म्हणून गोपाल उताणे यांनी काम पाहिले. बक्षीस वितरण समारंभाला प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख, ड .राजीव इंगोले यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. बक्षीस वितरण समारंभाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख होत्या. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्पर्धकांना बक्षीस देण्यात आले .यासोबतच महाविद्यालयाच्या विविध स्पर्धांमध्ये तसेच गुणवत्ता यादीत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता शितल सनकाडे या विद्यार्थिनीच्या नेतृत्वात आयोजन समितीने परिश्रम घेतले. बक्षीस वितरण समारंभाचे संचालन शिवहार इंगळे यांनी केले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिडीने डोंगर पेटविणार तो कोठडीची हवा खाणार

## उन्हाचा पारा चढू लागल्याने वनविभाग अलर्ट भारतीय वन अधिनियमात शिक्षेची तरतूद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

उन्हाळ्यात बिडीची जळती थोटके अथवा माचिसच्या एका काडीने जंगलात वणवा पेटू शकतो. वणवा एकदा का पेटला की जंगल बराच काळ जळत राहते. समाजकंटकांकडून लावल्या जाणाऱ्या वणव्याने नैसर्गिक साधनसंपत्तीचे मोठे नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी भारतीय वन अधिनियमात प्रतिबंधात्मक तरतुदी केल्या आहेत. नियमांचे उल्लंघन केल्याचे सिद्ध झाल्यास दोषींना कोठडीची हवा खावी लागते.

उन्हाळ्याची चाहूल सुरू झाली की वनविभाग सतर्क होतो. या कालावधीत लहाशी चूक झाल्यास वनसंपदा व वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येतो. चंद्रपूर जिल्ह्यात समृद्ध जंगल आहे. ताडोबा प्रकल्पाने वाघांचा जिल्हा म्हणून देशभरात ख्याती आहे.समृद्ध वनसंपदा व वन्यजीवांची विपुलतेने ताडोबासोबतच जिल्ह्याचे जंगल वन्यप्राण्यांसाठी सुरक्षित मानले जाते. मात्र उन्हाळ्यात लहानशी चूक जंगल व वन्यजीवांचा घात करू शकतो. त्यामुळे मुख्य वनसंरक्षकांच्या मार्गदर्शनात उन्हाळा सुरू होण्यापूर्वी दरवर्षी वणवा लागण्याचे संभाव्य धोके टाळण्यासाठी जंगलात प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाते.

**धोकादायक कालावधी**

फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या हफ्त्यानंतर ते जून महिन्याच्या शेवटपर्यंत वणवा लागण्याची शक्यता असते. वणवा ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. यातून अनावश्यक बाबी संपून अंकुर फुटण्यास मदत होते. मात्र, ती अनियंत्रित झाल्यास प्रचंड नुकसान होते.

**आग लागण्याची प्रमुख कारणे**

वनस्पती जाळणे, बिडी-सिगारेट, वीज उपकरणांमधील बिघाड, जाळपोळ करणे, जाणूनबुजून असो वा नसो शेती जाळणे किंवा जमीन साफ करताना वनस्पती जाळल्यास वणवे लागू शकतात.

# विकासकामे गुणवत्तेसह वेळेत पूर्ण करा - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## पालकमंत्र्यांनी घेतला सार्वजनिक बांधकाम विभागाचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**



जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्यात येईल. पांदण रस्ते आणि काँक्रिट रस्त्यांच्या कामातील गुणवत्ता उत्कृष्ट ठेवा. विकासकामे गुणवत्तेसह वेळेत पूर्ण करण्यावर भर द्या, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले.पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सभागृहात विविध विषयांचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. आमदार सर्वश्री रवी राणा, प्रताप अडसड, राजेश वानखडे, केवलराम काळे, उमेश यावलकर, प्रवीण तायडे, प्रवीण पोटे -पाटील, मुख्य अभियंता गिरीश जोशी, अधीक्षक अभियंता रुपा गिरासे, कार्यकारी अभियंता प्रतीक गिरी, राजेश सोनवाल, देवेंद्र अडचुले, प्रमोद वानखडे, रोहन पाटील आदी यावेळी उपस्थित होते. श्रीमती रूपा गिरासे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांचे यावेळी सादरीकरण केले. शासनाच्या १०० दिवसातील विकासकामांतर्गत करण्यात येत असलेले रस्ते व पूल बांधकाम यांची यावेळी माहिती दिली. जिल्ह्यात जेथे रस्त्यांच्या बांधकामाची जास्त निकड आहे, ती कामे त्वरित हाती घ्या. जास्त वर्दळीचे रस्ते, शेतीमालाची वाहतूक करण्यासाठी आवश्यक ठरणारे रस्ते अशा रस्त्यांच्या कामांना प्राधान्य द्या.या रस्त्यांची यादी शासनाकडे त्वरित मंजुरीला पाठवा. वनविभागामुळे जेथे रस्त्यांचे रुंदीकरण थांबले आहे तसेच नवीन रस्ते बांधकाम करण्यात अडचणी येत असल्यास याबाबत मंत्रालयीन स्तरावर कार्यवाही करण्यात येईल, असे पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी लोकप्रतिनिंधीशी चर्चा करून विकास कामे ठरवून नवीन कामे प्रस्तावित करावी. जिल्ह्यामध्ये जेथे-जेथे विश्रामगृहांची आवश्यकता आहे, तेथे नवीन विश्रामगृह बांधण्यासाठी शासनाकडे त्वरित प्रस्ताव सादर करावे. धारणी, सेमाडोह, बडनेरा येथे विश्रामगृह बांधण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे सादर करावे. तसेच अमरावती हे विभागस्तरीय ठिकाण असल्यामुळे येथील विश्रामगृहाचा विस्तार करण्यात यावा, असेही ते यावेळी म्हणाले.

पांदण रस्ते व काँक्रीट रस्त्यांच्या कामातील दर्जा व गुणवत्ता कायम ठेवून काम करण्यात यावे. अन्यथा त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करण्यात येईल. दोषी आढळल्यास त्यावर त्वरित कारवाई करण्यात येईल. सर्व उपअभियंतांनी याबाबत दक्षता बाळगण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. सन २०२१ -२२, २०२२ -२३ तसेच २०२३ -२४ या गेल्या तीन वर्षातील कामांची शासनामार्फत तपासणी करण्यात येईल. यासाठी विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यात येईल. पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागातील प्रलंबित देयकांची माहिती मागविली.